**सुविचार**
सन्तुष्टता व खुशी साथ- साथ रहते हैं । इन गुणों से दूसरे आपकी ओर स्वत: अकर्षित होंगे

विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०२४✦वर्ष ५३ वे✦अंक- ३५ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## भाजपसोबत सत्ता स्थापण्यासाठी बैठक झाली होती : शरद पवार




मुंबई : प्रतिनिधी- अजित पवार यांनी दावा केला होता की, विधानसभा निवडणूक २०१९ नंतर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांमध्ये सत्ता स्थापनेसाठी दिल्लीत बैठक झाली होती. त्यावेळी शरद पवार, अमित शाह यांच्यासह दोन्ही पक्षातील बडे नेते सामील झाले होते. शरद पवार यांनी देखील अशी बैठक झाल्याचे आता मान्य केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर अजित पवार सातत्याने म्हणत आहेत की, शरद पवारांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर सत्तास्थापनेसाठी भाजपला पाठिंबा दिला आणि ऐनवेळी माघार घेतली. मात्र याबाबत शरद पवारांनी कधीही स्पष्टपणे काही गोष्टी बोलून दाखवल्या नव्हत्या. मात्र पहिल्यांदाच शरद पवारांनी सत्तास्थापनेबाबत अमित शाह आणि भाजप नेत्यांसोबत बैठक झाल्याचे मान्य केले आहे.

शरद पवार यांनी म्हटले की, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या पहाटेच्या शपथविधीच्या आधी दिल्लीत ही बैठक झाली होती. भाजपसोबत जाण्यास माझा विरोध होता. पक्षातील नेत्यांकडून सातत्याने होणारी मागणी लक्षात घेऊन मी बैठकीला होकार दिला.

स्थिर सरकारसाठी रणनिती

दिल्लीत भाजप आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांची सत्तास्थापनेसाठी बैठक झाल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी देखील मान्य केले आहे. सरकार स्थापन करण्यासाठी आपण एकत्र येणार आहोत, असे शरद पवारांनी ठरवले होते. राज्यात १० नोव्हेंबरपर्यंत सरकार स्थापन झाले नाही तर राष्ट्रपती राजवट लागू होणार होती. मात्र राष्ट्रपती राजवट लागू देत, अशी रणनीती ठरली होती. (पान ७ वर)

## जनतेचा आग्रह असेल तर घराणेशाही आडवी येत नाही



इचलकरंजी : प्रतिनिधी- आम्ही उमेदवारी देताना जनतेचा आग्रह असेल, तर देतो. तो कोणाचा मुलगा आहे म्हणून देत नाही. राहुल आवाडे यांनी जिल्हा परिषदेमध्ये चांगले काम केले आहे. त्यामुळे माझे घराणेशाहीचे भाषण येथे लागू होत नाही तरीही त्याला जोडून विरोधक अपप्रचार करतात.

त्याला बळी न पडता आपल्याला महाराष्ट्र घडवायचा आहे. त्यासाठी भाजपच्या पाठीशी रहा आणि राहुल यांना निवडून द्या, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

महायुतीचे उमेदवार राहुल आवाडे यांच्या प्रचारार्थ शहापूर येथील निर्धार सभेत ते बोलत होते. यावेळी खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आवाडे, प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, कर्नाटकच्या आमदार शशिकला जोल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, मतदान करताना जात बघू नका, काम बघा. देशाचे भविष्य बदलायचे असेल, तर चांगले लोक, नेते, चांगला पक्ष यांच्या पाठीशी रहायला पाहिजे तरच देश बदलेल. स्वत:च्या स्वार्थासाठी काँग्रेस पक्षाने घटनेची मोडतोड केली आणि घटना बदलण्याचा आरोप आमच्यावर करीत आहेत. आम्ही घटना बदलणार नाही आणि बदलूही देणार नाही.

खासदार धैर्यशील माने म्हणाले, विरोधकांच्या हातातून निवडणूक गेल्याने ते घराणेशाही व जातीवादावर घसरत आहेत. हिंमत असेल तर विकासावर बोलावे आम्ही कोणत्याही व्यासपीठावर येण्यास तयार आहोत.

असे कुठे लिहिले आहे का?

सरकारने नागरिकांसाठी उज्ज्वला गॅस, लाडकी बहीण अशा विविध ६७ योजना आणल्या. त्यातून सर्व जाती-धर्मातील लोकांना न्याय दिला. हा लाभ देत असताना दलित आणि मुस्लिमांनी अर्ज करता कामा नये, असे कुठे लिहिले आहे का, असा सवाल गडकरी यांनी केला.

चार राज्यांत पेट्रोलला पर्याय देणार

सर्वच वाहन कंपन्यांच्या इथेनॉलवर (पान ७ वर)

## मी मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत नाही



मुंबई (प्रतिनिधी) : केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांनी मध्यंतरी केलेल्या वक्तव्यामुळे महायुतीत संशयकल्लोळ निर्माण झाला होता. या पार्श्र्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत आपण मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत नसल्याचे जाहीर केले आहे; परंतु भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मात्र फडणवीस काहीही म्हणाले तरी दिल्लीतील नेते निवडणुकीनंतर याबाबत निर्णय घेतील, असे सांगून त्यांचे नाव स्पर्धेत कायम ठेवले आहे.

एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत फडणवीसांना म्हणाले की, मी मुख्यमंत्री व्हावे, अशी भाजप पदाधिका-यांची आणि कार्यकर्त्यांची इच्छा आहे; पण आता मुख्यमंत्री होणे हे सर्व माझ्यासाठी गौण आहे. एक तर मुख्यमंत्रिपदाची कोणतीही शर्यत महायुतीत नाही आणि अशा शर्यतीत मी सहभागी नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. या विधानसभा निवडणुकीत भाजपला गेल्या वेळपेक्षा जास्त जागा मिळतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. २०१९ ला आमच्या १०५ जागा आल्या होत्या. या वेळी त्याही पेक्षा जास्त जागा येतील.

विदर्भातही आम्हाला चांगला प्रतिसाद असल्याचा दावा फडणवीस यांनी केला. एकनाथ शिंदे हे जवळपास अडीच वर्षे मुख्यमंत्री आहेत. त्यांनी त्यांची ताकद निर्माण केली. अजित पवार एक वर्षे उशिराने सरकारमध्ये आले. त्यांना दीड वर्षेच मिळाले. त्यातही अजित पवार यांना शरद पवार यांच्यासारख्या तगड्या नेत्यासोबत (पान ७ वर)

## छ. संभाजीनगरात सापडली सोन्या-चांदीने भरलेली गाडी

छ. संभाजीनगर : प्रतिनिधी- विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात येणा-या आणि जाणा-या प्रत्येक वाहनाची तपासणी केली जात आहे. यात राज्यात अनेक ठिकाणी निनावी रोकड निवडणूक आयोगाने जप्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील निल्लोड येथे निवडणूक आयोगाच्या पथकाने एका वाहनातून तब्बल १९ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने ताब्यात घेतले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, हे दागिने जळगाव येथील एका सोने व्यापा-याचे आहेत. त्याबाबत संबंधित व्यापा-याला व्यवहाराचे तपशील घेऊन बोलावण्यात आले आहे. त्यानंतर पुढील कारवाई होईल, अशी माहिती संबंधित अधिका-यांनी दिली आहे.

निवडणुकीच्या काळात जिल्ह्यात येणा-या प्रत्येक वाहनाची कसून चौकशी करण्यात येत आहे. जिल्ह्यात या अगोदर चाळीस लाखांची रोकड तपासणीत आढळून आली होती. त्यानंतर आता शहरातील जळगावकडे जाणा-या एका गाडीमध्ये १९ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आढळून आले आहेत. ही कारवाई गुरुवारी (१४ नोव्हेंबर) सायंकाळी निल्लोड येथे करण्यात आली. (पान ७ वर)

## भाजपशी मतभेद पण कोणी बोलणार असेल तर चर्चेची तयारी : उद्धव ठाकरे



सिल्लोड : प्रतिनिधी- तुमचे आमचे मतभेद असतील. त्याच्यासाठी माझ्याशी कुणी बोलायला तयार असेल तर मीही बोलायला तयार आहे. पण आता ही संधी आहे, अशी साद उद्धव ठाकरे यांनी भाजप नेते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना घातली आहे. सिल्लोड येथील प्रचारसभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी अब्दुल सत्तार यांच्याविरोधात सगळ्यांना एकत्र येण्याचं आवाहन केले.

आज इथं सगळे एकवटलेत, सर्व एकटवल्यानंतर समोर कितीही मोठा माणूस असू दे तो कोलमडून पडल्याशिवाय राहत नाही हा या देशाचा इतिहास आहे. मी भाजपला आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना सांगतोय ही संधी सोडू नका. आपली संस्कृती आणि आपले संस्कार वेगळे आहेत, मी भाजप कार्यकर्त्यांना आवाहन करतोय असं उद्धव ठाकरेंनी म्हटले.

दरम्यान, मी भगवा झेंडा घेऊन महाराष्ट्रात फिरतोय, आज माझ्यासमोर मुस्लीम भगिनी बसल्यात. त्यांना भीती का वाटत नाही, आम्ही हिंदुत्ववादी आहोत. हिंदुत्व सोडलं नाही तरीही एवढ्या गर्दीने माझ्या मुस्लिम भगिनी सभेला येऊन बसतात, त्यांना इथे भीती वाटत नाही बिनधास्त बसतात. उलट त्यांच्यापासून भीती वाटते. हेच तर आमचे हिंदुत्व आहे.

(पान ७ वर)

## महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याशेजारी होणारी सभा ऐतिहासिक



लातूर/ प्रतिनिधी: महात्मा बसवेश्वर हे सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान आहेत.महामार्गाच्या कामात बसवेश्वरांचा पुतळा येत असताना त्यावर राजकारण झाले पण भाजप शिष्टमंडळाने विनंती केल्यानंतर पुतळा हलला नाही. त्यामुळे या पुतळ्याशेजारी होणारी ही सभा ऐतिहासिक आहे,असे प्रतिपादन भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

गुरुवारी सायंकाळी महात्मा बसवेश्वर चौकात झालेल्या सभेत डॉ.अर्चनाताई पाटील बोलत होत्या.या ऐतिहासिक सभेस माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अॅड.व्यंकट बेद्रे,भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,माजी जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने,राष्ट्रवादीचे प्रशांत पाटील, डॉ.भातांब्रे,युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर,बाबू खंदाडे,बाबासाहेब कोरे,डी.एल.कांबळे,जितेंद्र बनसोडे आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या की,महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा राष्ट्रीय महामार्गाच्या कामात येत होता.त्यावेळी त्यावरून राजकारण करण्यात आले.सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असणाऱ्या महात्मा बसवेश्वरांचा पुतळा हलवू नये.राष्ट्रीय महामार्ग त्याच्या बाजूने जावा यासाठी भाजपाच्या शिष्टमंडळाने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली.ती विनंती मान्य झाली.यामुळे महात्मा बसवेश्वरांचा पुतळा हलला नाही.त्याच चौकात आज ही सभा होत आहे.त्यामुळे ही सभा (पान ७ वर)

### देव आणि घरहि ताईंसोबत: कव्हेकर

या सभेत मार्गदर्शन करताना माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की,ही निवडणूक आता जनतेनेच हातात घेतली आहे. भाजपा देशाचा आणि राज्याचा सर्वंकष विकास करू शकते हे जनतेच्या लक्षात आले आहे. राज्यातील महायुती सरकारने जनहिताच्या असंख्य योजना राबवल्या आहेत. त्यामुळे सरकार पुन्हा येणारच आहे. लातूर शहर मतदारसंघात देव आणि घरहि डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या सोबत आहे,असेहि कव्हेकर म्हणाले.

## औशाच्या विकासासाठी मी आणि अभिमन्यूजी एकत्र आलोय : बसवराज पाटील

औसा - मला या मतदारसंघात दहा वर्ष आमदार म्हणून काम करण्याची संधी मिळाली आणि या दहा वर्षांत याठिकाणी विकासकामे केली. त्या तुलनेत या पाच वर्षांत आमदार म्हणून अभिमन्यू पवार यांनी निश्चित अधिक कामे केली आहेत. हा तालुका विकासापासून वंचित राहिलेला आहे. त्यामुळे येथील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी अभिमन्यू पवार यांच्यासारख्या आमदारांना याठिकाणी काम करण्याची संधी देण्याची गरज आहे. योगायोगाने राज्यात चांगले लोक एकत्र येऊन हे सरकार निर्माण झाले आहे. आणि औशात विकासासाठी मी व अभिमन्यू पवार एकत्र आलो आम्ही एकत्र येणे हा चांगला योग असून औशाच्या भविष्यासाठी पुन्हा अभिमन्यूजींना संधी द्यावे असे आवाहन माजीमंत्री बसवराज पाटील यांनी केले आहे.



महायुती चे अधिकृत उमेदवार आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रचारार्थ औसा तालुक्यातील मातोळा येथे (दि.१४) रोजी आयोजित प्रचार सभेत बोलताना केले. यावेळी मंचावर आमदार अभिमन्यू पवार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने,राष्ट्रवादी चे तालुकाध्यक्ष दत्तात्रय कोळपे,भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, अॅड श्रीकांत सुर्यवंशी, शिवसेनेचे तालुकाप्रमुख तानाजी सुरवसे, प्रा सुधीर पोतदार, बसवराज धाराशिवे, हाणमंत राचट्टे, संगायो समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, शिवाजी भोसले, संजय भोसले, दिनकर मुंगळे, तुराब देशमुख आदीसह ग्रामस्थ मोठ्य़ा संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना माजीमंत्री बसवराज पाटील म्हणाले की निवडणूक आली की मातोळा येथील लोकांना भेटावेसे वाटते एका वेगळ्या इतिहासाचे हे गाव असून वेगळी प्रेरणा या गावातून मिळाली आहे. त्यामुळे अभिमन्यू पवार व मी हि प्रेरणा व आशिर्वाद घेण्यासाठी आलो आहे. एक चांगला विचार लोकांमध्ये मांडण्याचा प्रयत्न आम्ही सातत्याने केला असून आमदार अभिमन्यू पवार यांच्या माध्यमातून मतदारसंघात चांगले विकासकामे केली जात आहेत. तुम्ही या काळात माझेही काम पाहिले आहे. या पाच वर्षांत आमदार अभिमन्यू पवार यांचेही काम पाहिले आणि आणखी दुसऱ्याचेही काम पाहिले आहे. त्यांचे (पान ७ वर)

## लातुरला पहिली महिला आमदार मिळावी ही तर महिला डॉक्टरांची इच्छा



लातूर/प्रतिनिधी:देशाला डॉक्टरांचा पुरवठा करणारी खाण,लातूर पॅटर्न अशी ओळख प्रस्थापित करणाऱ्या लातूर शहर मतदारसंघाला पहिली महिला आमदार मिळावी अशी इच्छा शहरातील सर्व प्रथितयश महिला डॉक्टरांनी व्यक्त केली.डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या रूपाने ही इच्छा पूर्णत्वाकडे जाणार असून त्यासाठी सारी डॉक्टर मंडळी कामाला लागली असल्याचे चित्र शुक्रवारी दिसून आले.

लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कस्तुराई मंगल कार्यालयात शहरातील महिला डॉक्टरांची संवाद बैठक संपन्न झाली. भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा रागिनीताई यादव यांच्यासह शहरातील प्रख्यात डेंटिस्ट डॉ.पुष्पलता सोमाणी, रेडिओलॉजिस्ट डॉ. अरुणा देवधर,आयुर्वेद तज्ञ डॉ. आरती संधीकर,होमिओपॅथी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉ.अर्चना आपटे,डॉ.ऋजुता अयाचित यांच्यासह शहरातील मान्यवर महिला डॉक्टर या बैठकीस उपस्थित होत्या.

डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी स्वत:ला रुग्णसेवेत झोकून देत मोठे काम उभे केले आहे.एक डॉक्टर आमदार असेल तर मतदार संघातील नागरिकांच्या आरोग्याची काळजीच राहणार नाही.त्यामुळे अर्चनाताईंना निवडून देण्याचा निर्धार या बैठकीत सर्व डॉक्टरांनी केला. वैद्यकीय व्यवसाय करताना विविध अडचणी येतात,त्यांची वेळीच सोडवणूक व्हावी. शहरात ८ दिवसानंतर पिण्याचे पाणी मिळते,ही अडचण दूर करावी. शहरातील रस्ते चांगले व्हावेत. जातीपातीचे राजकारण थांबवावे,अशी अपेक्षा यावेळी डॉक्टरांनी व्यक्त केली. लातूर शहर मतदारसंघात आता परिवर्तनाची लाट आली आहे. अर्चनाताईंच्या रूपाने विकासाची दृष्टी असणारे नेतृत्व आपल्याला लाभणार आहे.बदल करण्याची हीच संधी असून या संधीचे सोने करावे,असे आवाहन डॉक्टरांच्या वतीने यावेळी करण्यात आले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, कोणाच्याही दबावाला बळी न पडता ही बैठक पार पडली याचा मनस्वी आनंद मला होत आहे. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधीकडे इच्छाशक्ती असावी लागते.त्याला (पान ७ वर)

## विरोधकांना सहकार क्षेत्र मोडीत काढायचा आहे त्यापासून सावध रहा : दिलीपराव देशमुख



लातूर/प्रतिनिधी-राज्यातील महायुती सरकार हे घटनाबाह्य सरकार असून या सरकारने सर्व समाजाला फसवले आहे कुठलाच समाज घटकांना न्याय दिलेला नाही त्यामुळें येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आघाडीचे उमेदवार आमदार धीरज विलासरावजी देशमुख यांना अधिक मताधिक्य देवुन विजयी करावे असे आवाहन राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी करत आपल्या भागातील सहकार क्षेत्र जपण्याचे काम आपल्या सर्वांच्या सहकार्याने झालेले आहे मात्र विरोधक मात्र हे सहकार क्षेत्र मोडीत काढण्याचा त्यांचा डाव असून त्यापासून आपण वेळीच सावध राहिले पाहिजे असे सांगून विकास कामासाठी आम्ही कटिबध्द आहोत पुढेही राहू असा शब्द माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी यावेळी दिला गुरुवारी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील महा विकास आघाडीचे उमेदवार आमदार धीरज देशमुख यांच्या प्रचारार्थ लातूर तालुक्यातील मुरूड अकोला, चिंचोली, गादवड, शिराळा येथे आयोजित संवाद बैठकीत ते बोलत होते .

यावेळी माजी आमदार अॅड वैजनाथ शिंदे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील,मांजरा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष धनंजय देशमुख, मांजरा साखर कारखान्याचे संचालक अशोकराव काळे , बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, तालुका काँग्रेस उपाध्यक्ष दयानंद बिडवे, विजयमूर्ती शेटे विलास साखर कारखान्याचे संचालक अनिल पाटील, विलास साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब बिडवे, बाजार समितीचे संचालक शेळके, मीडिया सेलचे जिल्हाध्यक्ष हरिराम कुलकर्णी, भीमाशंकर शेटे, शेतकरी संघटनेचे नेते सत्तार पटेल अरुणदादा कुलकर्णी, मदन भिसे ,बंकट कदम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

गावातील मतभेद बाजूला सारून सर्वांगीण विकासासाठी (पान ७ वर)

# गिरवलकर मंगल कार्यालयात सकल लातूर जिल्हा जंगम समाज वधू- वर परिचय मेळाव्याचे आयोजन

लातूर : प्रतिवर्षाप्रमाणे लातूर येथे येत्या दि. १ डिसेंबर २०२४ रोजी गिरवलकर मंगल कार्यालयात सकल लातूर जिल्हा जंगम समाज वधू- वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीच्या मेळाव्याच्या अध्यक्षपदी दयानंद चंद्रकांत स्वामी (कोकलगे) यांची निवड करण्यात आली आहे. सचिवपदी बसवेश्वर विश्वनाथ स्वामी यांची तर कोषाध्यक्षपदी त्र्यंबक गुरुनाथ स्वामी यांची निवड करण्यात आली आहे.

सकल जंगम समाजाच्या वतीने घेण्यात येणारा हा सलग १२ वा वधू - वर परिचय मेळावा आहे. यावर्षीचा हा मेळावा दि. १ डिसेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत गिरवलकर मंगल कार्यालयात पार पडणार आहे. या मेळाव्याची उर्वरित कार्यकारणी सर्वानुमते खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

उपाध्यक्ष : शिवशंकर प्रभुलिंग स्वामी , सहसचिव : ब्रह्मानंद बंडप्पा स्वामी , सहकोषाध्यक्ष संतोष वैजनाथ स्वामी कोळ्ळे, कार्याध्यक्ष चंद्रशेखर मल्लिकार्जुन स्वामी हुंडेकरी, स्वागताध्यक्ष मन्मथ बसवण स्वामी, बाभळगावकर, व्यासपीठ प्रमुख काशिनाथ गुरुबसय्या तोगुरगे स्वामी, मेळावा संघटक विजयकुमार स्वामी हुंडेकरी उदगीर,कार्यवाहक डॉ.संजय स्वामी चाकूरकर व डॉ.अशोक स्वामी सांगवीकर,

कार्यकारणी सदस्य योगेश वीरभद्र स्वामी, निळकंठ स्वामी हरंगुळकर, महिला प्रतिनिधी शिवकिर्तनकार सौ. कमल शिवकुमार स्वामी नळेगावकर व सौ. संध्या धनराज स्वामी.,

सूत्रसंचलन :-* कुमार स्वामी गणाचार्य महाराज व शिवकांत स्वामी गुरुजी, प्रसिद्धी प्रमुख श्रीधर सांबय्या स्वामी

नोंदणी प्रमुख * सौ.शारदा सुनील स्वामी मोबाईल नंबर ८९९९२९९१९१, वधू वर नोंदणी अर्ज नोंदणी प्रमुख सौ. शारदा सुनील स्वामी यांच्या ८९९९२९९१९१ या एकाच व्हाट्सअप नंबर वर नोंदणी अर्ज पाठवून नोंदणी शुल्क ३००/- तिनशे रुपये भरून नोंदणी करण्यात यावी. याच ३००/- तिनशे रुपये नोंदणी शुल्कामधे वधू वर नोंदणी पुस्तिका मोफत मिळेल. वधू वर नोंदणी पुस्तिका पोस्टाने पाहिजे असल्यास पोस्टेज खर्च शंभर रुपये जास्त म्हणजे एकूण ४०० रुपये ८९९९२९९१९१ या नंबर वर फोन पे अथवा गुगल पे पैसे पाठवण्यात यावेत त्याची पावती व्हाट्सअप वर देण्यात येईल ती पावती जपून ठेवण्यात यावी. पावती शिवाय वधू वर नोंदणी पुस्तिका मिळणार नाही .

# निवडणूक साहित्याचे वितरण

नांदेड (प्रतिनीधी ): मुंबई, पुणे, संभाजीनगर आदी ठिकाणावरून शासकीय मुद्रणालय व पुरवठादार यांच्याकडून प्राप्त होणारे विविध प्रकारचे साहित्य वितरणाचे महत्त्वपूर्ण काम साहित्य वितरण कक्षातून सुरू आहे. नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक मतदारसंघासाठी जवळपास हे वितरण सुरु आहे.

लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा निवडणुकीमध्ये आवश्यक साहित्य वितरण वेळेत व्हावे, याला अधिक महत्त्व दिले जाते. यासाठी आचारसंहिता लागल्यापासून साहित्य वितरण कक्ष स्थापन केला जातो. जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती रूपाली चौगुले यांच्या मार्गदर्शनात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवनांमध्ये या साहित्य कक्षाची उभारणी करण्यात आली आहे.



निवडणुकांमध्ये मतदान केंद्रावर आवश्यक ते सर्व साहित्य पुरविणे व त्याची नोंद या कक्षामार्फत करण्यात येते. अधिक सुबक, प्रगत असे साहित्य सध्या वापरण्यात येत आहे. ईव्हीएमचे बॅलेट युनिट कव्हर करणारे कंपार्टमेंट, पोस्टर, सूचना पत्र,ओळखपत्रे, लेखन सामग्री, स्टेशनरी, विविध नमुने, लिफाफे, कागदी सील, वोटर स्लिप, बॅलेट पेपर, शिक्के, माहितीपुस्तीका, हस्तपुस्तिका, मतदान अधिकाऱ्याना वापरण्यात येणारे विविध प्रकारचे आवश्यक साहित्य या कक्षामार्फत दिले जाते. जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासह त्यांची मोठी टीम या कार्यामध्ये सहभागी झाली आहे.

# पाचशे कामगारांना मतदानासाठी मिळाली अर्धी सुट्टी

## कामगाराना दिली मतदान करण्याची शपथ

नांदेड (प्रतिनीधी): माझ्या एका मताने फरक पडतो म्हणून प्रत्येकांनी मतदान केलेच पाहिजे. जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत व ०८७ विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ सचिन खल्लाळ यांच्या आवाहनास प्रतिसाद देत , गुंडेगाव परिसरातील सुप्रीम गोल्ड लिमिटेड , सुरज रूफिंग व सुरज मेटल्स अशा विविध कंपनीतील जवळपास पाचशे कामगारांना येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदानासाठी पगारी अर्धी सुट्टी आज घोषित केली आहे.




अशी घोषणा सुरज ग्रुप इंडस्ट्रीजचे चेअरमन रमेश सेठ,संचालक राम तुप्तेवार,राहूल पारसेवार व गजानन येरावार यांनी केली. मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी व मतदान जनजागृतीच्या कार्यासाठी सुट्टी जाहीर केली. गुंडेगाव परिसरातील सुप्रीम गोल्ड लिमिटेड , सुरज रूफिंग व सुरज मेटल्स अशा विविध कंपनीतील जवळपास पाचशे कामगारांसाठी ०८७ नांदेड दक्षिण स्वीप कक्षाच्यावतीने मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी राम तुप्तेवार यांनी कामगारांना मतदानाचे महत्त्व पटवून देवून मी मतदान करणारच अशी शपथ दिली. या कार्यक्रमास रुस्तुम आडे, डॉ घनश्याम येळणे, प्रा.राजेश कुलकर्णी, संजय भालके, बंडू आमदूरकर व बालासाहेब कच्छवे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.जी.कुलकर्णी यांनी केले तर आभार एस.व्ही. भालके यांनी मानले.

# चांगल्या गणित शिक्षकाने योग्य मार्गदर्शन केल्यास प्रत्येकाला गणिततज्ञ होता येते : गीताताई महाशब्दे

लातूर : अनेकांना गणित हा विषय अतिशय क्लिष्ट, अवघड आहे असे वाटत असते. पण हा विषय जर एखाद्या चांगल्या गणित शिक्षकाने योग्य मार्गदर्शन करून शिकवल्यास प्रत्येकाला गणिततज्ञ होता येते, असे प्रतिपादन पुण्याच्या नवनिर्मिती फाऊंडेशनच्या गणिततज्ञ गीताताई महाशब्दे यांनी केले.

येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात स्व. नंदकिशोर भार्गव शिक्षण अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या गणित शिक्षक प्रशिक्षणाच्या उदघाटन समारंभात त्या मार्गदर्शन करत होत्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल , कोषाध्यक्ष जयेश बजाज, चैतन्य भार्गव , सुभाष कासले , व्यंकट गर्जे , सूर्यप्रकाश धूत, पपरुनिया , मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदींची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षण कार्यक्रमात श्रीकिशन सोमाणी, केशरबाई भार्गव , गोदावरीदेवी लाहोटी कन्या आदी विद्यालयांतील शिक्षकवृंद सहभागी झाले आहेत.



हे प्रशिक्षण तीन दिवस चालणार आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे संस्थापक सचिव स्व. नंदकिशोर भार्गव यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. गीताताई महाशब्दे, त्यांच्या सहकारी सुषमा बक्षी यांचे संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना गीताताई महाशब्दे यांनी गणित हा विषय वाटतो किंवा आपण समजतो तेवढा नक्कीच क्लिष्ट नसल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या मनात गणिताबद्दल असलेली अनाहूत भीती कमी करण्याच्या उद्देशाने आपण राष्ट्रभाषा शिकवल्याप्रमाणे गणित विषय शिकवता येईल का, या उद्देशाने २००० साली हा प्रयोग सुरु केला. गणित विषयाची भीती बाळगू नये. योग्य मार्गदर्शनाने गणितावर प्रभुत्व मिळवणे शक्य आहे. जगातले प्रत्येक मूल गणितात प्राविण्य मिळवणारे झाले पाहिजे हाही आपला मूळ उद्देश्य आहे. गणित प्रत्येकाला येते. पण आपल्याला कोणी ते शास्त्रोक्त भाषेत शिकवत नाही, म्हणून ते अवघड वाटते. पहिलीपासून दहावीपर्यंत गणित सोप्या पद्धतीने कसे शिकवायचे हे या उपक्रमाच्या माध्यमातून आपण सांगणार आहोत. या उपक्रमाचा गणित विषय शिक्षकांना नक्कीच लाभ होणार आहे व त्यांचे विद्यार्थीही नजीकच्या काळात गणितात कुशाग्र बुद्धीचे झाल्याचे पाहावयास मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल, चैतन्य भार्गव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमाकांत स्वामी यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी या अभियानाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भाग्यश्री पोतदार यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी यांनी केले.

# गोड बोलणाऱ्या आमदाराला जागा दाखवून द्यावी: कापसे

कळंब दि.१३ (प्रतिनिधी) - गेल्या पाच वर्षात परिसरात कोणताही ठोस विकास झालेला नाही. नागरिकांच्या मुलभूत गरजा, रस्ते, पाणी पुरवठा,

स्वच्छता आदी प्रश्न आजही तसेच आहेत. मात्र या आमदाराने या समस्यांकडे दुर्लक्ष केले आहे.

फक्त गोड बोलण्यात अग्रेसर असणाऱ्या आमदाराला या निवडणुकीत मतदार संघातील जनतेने जागा दाखवून द्यावी असे आवाहन शिवसेना नेते शिवाजी कापसे यांनी दि.१३ नोव्हेंबर रोजी केले. कळंब तालुक्यातील ईटकुर येथे विधानसभा मतदार संघातील



महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांच्या प्राचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी उमेदवार पिंगळे म्हणाले की, या आमदाराच्या निष्क्रियतेमुळे परिसरातील जनता त्रस्त आहे. नागरीकांच्या अपेक्षेप्रमाणे कूठल्याही भागाची विकासकामे झाली नसल्याचे नाही. तसेच स्थानिक नागरिकांनी आता जागृत होऊन आपल्या हक्कांसाठी मतदान यंत्रावरील एक नंबर क्रमांकावर माझे चिन्ह धनुष्य बाण असून भरघोस मते देवून विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रवक्ता विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा.सुशील शेळके, पंचायत समितीचे माजी उपसभापती लक्ष्मण आडसूळ यांनीही आपले विचार व्यक्त केले. यावेळी वाकडी (केज) येथील अनेक युवकांनी शिवसेनेत प्रवेश केला. या सभेस महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गंभीरवाडी, वाकडी (केज) व आंदोरा येथील नागरिक उपस्थित होते.

# महाविकास आघाडीचे उमेदवार धीरज पाटील यांच्या प्रचारासाठी कार्यकर्ते मैदानात

धाराशिव दि.१४ (प्रतिनिधी) - तुळजापूर विधानसभेत महाविकास आघाडीत अनुभवी, कार्यकर्त्याबरोबर तरूण तडफदार युवा कार्यकर्त्यांच्या हातात प्रचाराची सर्व सुत्रे घेऊन तन मनाने,जिव ओतुन प्रचार कार्य करण्यास तत्पर आहेत. गल्लोगल्लीतील प्रत्येक मतदाराला भेटून धिरज कदम पाटील याचां प्रचार करीत आहेत. तर धाराशिव तालुक्यातील ७२ गावांचे तुळजापूर येथील ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते प्रचार करीत आहेत.



तुळजापूर सह धाराशिव, नळदुर्ग, तामलवाडी, काटी, आरळी, अणदूर मंगरूळ, कांक्रबा, तेर, केशेगाव, नंदगाव बारूळ आदींसह इतरही अनेक ठिकाणी प्रचार कार्यालये उघडून कार्यकर्ते व पदाधिकारी जोराचा प्रचार चालू केला आहे. गोपीचंद पडळकर यांनी लिंगायत समाजास अपशब्द बोलून समाजाचा अपमान केला आहे.म्हणून तुळजापूर राष्ट्रवादी शरदचंद्र गटाचे तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी राज्यपालानां एक निवेदन देऊन त्यांची विधान परीषद आमदारकी रद्द करावी अशी मागणी केली आहे.

तसेच महाविकास आघाडीच्या महीला ब्रिगेडही डॉ शुभांगीताई पाटील, शामलताई वडणे, शुभांगीताई राजुरकर, शोभाताई शिंदे, सुरेखाताई मुळे, प्रतिभा पाटील, अंजली पाटील, वंदना पाटील, माधुरी पाटील, स्वाती पाटील, सई पाटील, उर्मिला जाधव, वनिता पाटील, हर्षदा पाटील , अंजली कुतवळ, प्रिया पाटील, वैशाली पाटील, स्वाती सुपनार आदी महीला ब्रिगेडसह गावातील बचत गटाच्या महीलाही उत्साहाने प्रचार करत आहेत. तर ड धिरज पाटील यांनी वरूडा, मुळेगाव, किणी, बावी, तुगाव रूई ढोकी, गडदेवधरी, शेकापूर, देवळाली, मेंडसिंगा, रूईभर, बरमगाव, आंबेगाव, गौडगाव, महाळंगी आदी गावी भेट दोरे करून जोरदार प्रचार केला. तसेच मानवी हक्क अभियान सलग्न न्यु भारतीय टायगर सेनेने पाटील यांना जाहीर पांठीबा दिला आहे.

# मतदान व मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्री बंद

नांदेड(प्रतिनीधी): लोकसभा पोट निवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यात २० नोंव्हेंबर २०२४ रोजी मतदान होत असून त्याची मतमोजणी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निश्चित केलेल्या स्थळी होणार आहे. मतदानाची प्रक्रिया मुक्त व निर्भयपणे व शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने व शांतता, सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन अनुचित प्रकार घडू नये यासाठी लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३५ (सी) महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम १४२ (१) तरतुदीनुसार तसेच निवडणूक आयोगाच्या विविध निर्देशानुसार नांदेड जिल्ह्यातील सर्व ठोक व किरकोळ अनुज्ञप्ती मद्यविक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत.

निवडणूकीच्या आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व खर्चावर नियंत्रण, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तुंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी तसेच सार्वजनिक शांतता अबाधित ठेवण्यासाठी नांदेड जिल्ह्यात मतदान संपण्यापुर्वी ४८ तास अगोदर ते मतदान संपेपर्यत १८ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६ वाजेपासून ते २० नोंव्हेबर २०२४ रोजी सांयकाळी ६ वाजेपर्यत किंवा मतदान संपेपर्यत तसेच मतमोजणीच्या दिवशी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी संपूर्ण दिवस मतमोजणी प्रक्रीया संपेपर्यत संपूर्ण नांदेड जिल्ह्यात अनुज्ञपती बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करुन मद्यविक्री करीत असल्याचे आढळून आल्यास संबंधित अनुज्ञप्ती रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी, असे आदेशात नमूद केले आहे.

## आत्मबोध ५४

लहान बालके । सर्वांना
आवडे ।
आपण नावडे । अनेकांना
॥ १ ॥

वय वाढताना । स्वार्थही
वाढते ।
तेव्हा दूर जाते । माणुसकी
॥ २ ॥

बालक चेहरा । निरागस
आहे ।
सदा चिंता वाहे । मनुष्य हा
॥ ३ ॥

आपल्यात आहे । मीच
आणि माझे ।
असे आता ओझे । कमी
करू ॥ ४ ॥

सिद्धदास म्हणे । निश्रि्चत
आवडू ।
अहंकार काढू । मग तेव्हा
॥ ५ ॥

सिद्धदास, सोलापूर
१०/०३/२०२२



# प्रा. डॉ सावंत यांनी ताफा थांबवून अपघातग्रस्तांच्या मदतीला गेले धावून

भूम दि.१५ (प्रतिनिधी) - विधानसभेच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असताना प्रचार दौर्यात व्यस्त असलेले जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्यातील संवेदनशीलता पुन्हा एकदा दि.१५ नोव्हेंबर रोजी दिसून आली.

प्रा डॉ सावंत हे भूम दौर्यावर असताना त्यांच्या समोर एका दुचाकीस्वाराचा अपघात झाला. हा दुचाकीस्वार व त्याचे कुटुंबिय रस्त्यावर पडलेले पाहून सावंत यांनी तातडीने आपला ताफा थांबवित खाली उतरून मदत व बचाव कार्य सुरू केले. जखमींना तातडीने नजीकच्या रूग्णालयात हलवले आहे. एवढेच नाही तर जखमींना आधार देत, काळजी करू नका, काही होणार नाही, मी तुमच्या पाठीशी आहे, असा धीर देखील त्यांनी दिला. प्रा. डॉ. सावंत यांची ही संवेदनशीलता पाहून जखमींसह घटनास्थळी उपस्थित सर्वांनाच गहीवरून आले होते.

# दिव्यांग, ज्येष्ठ मतदारांनी बजाविला मतदानाचा अधिकार

लातूर, दि. १५ : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. तसेच भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांवरील मतदार आणि दिव्यांग मतदारांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधेनुसार जिल्ह्यात ११ नोव्हेंबरपासून गृह मतदान (होम वोटिंग) सुरु झाले आहे. यामध्ये दिव्यांग मतदारांसह वयाची शंभरी ओलांडलेल्या आजी-आजोबांनीही मतदानाचा हक्क बजाविला. तसेच भारत निवडणूक आयोगाने घरातूनच मत नोंदविण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.



लातूर ग्रामीण मतदारसंघात ११ नोव्हेंबर रोजी गृह मतदानाचा पहिला टप्पा झाला. यामध्ये नियोजित मतदारांच्या जवळपास ९४ टक्के मतदारांनी आपला अधिकार बजाविला. तसेच उदगीर आणि निलंगा विधानसभा मतदारसंघात १४ नोव्हेंबर रोजी पहिल्या टप्प्यातील गृह मतदान झाले. दिव्यांग मतदारांसह वयोवृद्ध मतदारांनी यावेळी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. निलंगा येथे सामान्य निवडणूक निरीक्षक लक्ष्मीकांत प्यारेलाल प्रधान यांनी या प्रक्रियेची पाहणी केली. १४ नोव्हेंबर रोजी निलंगा विधानसभा मतदारसंघात ७०१ मतदारांचे गृह मतदान पूर्ण झाले.

उदगीर येथे निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत शिंदे यांनी करडखेल येथील वयाची १०५ वर्षे पूर्ण केलेल्या मतदार जिजाबाई किसन कसबे यांच्या गृह मतदानाप्रसंगी उपस्थिती लावली. १४ व १५ नोव्हेंबर रोजी उदगीर विधानसभा मतदारसंघात जवळपास ६२६ मतदारांनी आपला अधिकार बजाविला.

अहमदपूर, लातूर शहर आणि औसा मतदारसंघातील गृह मतदानाचा पहिला टप्पा १५ नोव्हेंबर रोजी पार पडला. या मतदारसंघातील ज्येष्ठ मतदार, दिव्यांग मतदार यांनी आपला हक्क बजावून लोकशाही बळकट करण्याच्या प्रक्रियेत आपला सहभाग नोंदविला. अहमदपूर विधानसभा मतदारसंघ अंतर्गत नळेगाव येथील गृह मतदान प्रक्रियेची सामान्य निवडणूक निरीक्षक साकेत मालवीया यांनी पाहणी केली. लातूर शहरातील पूर्णपणे दिव्यांग असलेला युवक शेख अफताब खय्युम, संत गाडगेबाबा अनाथ व गतिमंद मुलांच्या बालगृहातील दिव्यांग मतदार ज्ञानेश्वर, उद्धव कराड,



सचिन चिंताले यांनी आज मतदान केले. दिव्यांगत्वामुळे मतदान केंद्रांवर पोहचण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागला असता, मात्र गृह मतदानामुळे मतदानाची प्रक्रिया सोयीस्कर झाल्याचा आनंद यावेळी त्यांच्या पालकांनी व्यक्त केला. लातूर शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, गणेश सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली गृह मतदानाचे नोडल अधिकारी रूक्मानंद वडगावे, सहायक नोडल अधिकारी सूर्यकांत लोखंडे, सोमेश्वर होळकर यांनी जास्तीत जास्त मतदान पूर्ण करण्यासाठी नियोजन केले.

यशवंत
धाराशिव जिल्हा
शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## मल्हार पाटील यांनी शिंदेवाडी व दारफळ येथील नागरिकांशी साधला संवाद



धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ मल्हार पाटील यांनी धाराशिव तालुक्यातील शिंदेवाडी व दारफळ येथे भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. आ. पाटील यांच्या माध्यमातून तीर्थक्षेत्र तुळजापूर मंदिर विकास आराखडा, धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे प्रकल्प, कौडगाव एमआयडीसी, कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्प अशा अनेक प्रकल्पांमुळे संपूर्ण धाराशिव जिल्हा विकासाच्या नव्या शिखरावर पोहोचत असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. तसेच प्रगतीचा हा प्रवाह कायम रहावा यासाठी येत्या विधानसभा निवडणुकीत आपण सर्वांनी आ पाटील यांना भक्कम पाठिंबा द्यावा, असे आवाहन पाटील यांनी केले.

# महाविकास आघाडीने केवळ सत्तेसाठी एकत्र येऊन राज्याचा विकास रोखला - खा. शिंदे



कळंब दि.१५ (प्रतिनिधी) – महायुती सरकारने कमी कालावधीत राज्यातील जनतेस फायदे होणाऱ्या अनेक योजना राबवल्या आहेत. हे सरकार विकासाला प्राधान्य देत असून, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला आणि सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी सातत्याने काम करत आहे. मात्र, महाविकास आघाडीचे धोरण हे फक्त सोयीचे राजकारण करण्याचे आहे. त्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना तिलांजली देत अनैसर्गीक आघाड्या करून केवळ सत्तेसाठी एकत्र येऊन राज्याचा विकास रोखला असल्याचा घनाघात खासदार श्रीकांत शिंदे यांनी महा विकास आघाडीवर दि.१५ नोव्हेंबर रोजी केला.

कळंब शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात सभा महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांच्या प्रचारार्थ सभा व पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना खा. शिंदे म्हणाले की, महायुती सरकारच्या योजनांमुळे ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली आहे. महायुतीचे सरकार सक्षम व स्थिर असून जनतेच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठीच या सरकारमध्ये

## अजित पिंगळे यांच्या प्रचारार्थ हजारोंची पदयात्रा

सामील होण्यासाठी आपल्या हक्काच्या माणसाला गरिबीची जाण असणारे उमेदवार अजित पिंगळे यांना निवडून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रारंभी छत्रपती संभाजी राजे चौकातून हजारो समर्थकांच्या उपस्थितीत पदयात्रा काढण्यात आली.

या पदयात्रेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळयास व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यास खा.डॉ.श्रीकांत शिंदे, आ राणाजगजितसिंह पाटील व उमेदवार अजित पिंगळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी खासदार शिंदे यांनी महायुती सरकारच्या यशस्वी योजनांची माहिती देत महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. खा शिंदे म्हणाले की, कळंब –धाराशिव मतदार संघाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा एकनिष्ठ व त्यांनी नावाजलेला बालशिवसैनिक असलेला उमेदवार दिला आहे. महायुती सरकारने कमी कालावधीत राज्यातील जनतेस फायदे होणाऱ्या अनेक योजना राबवल्या आहेत. हे सरकार विकासाला प्राधान्य देत असून, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला आणि सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी सातत्याने काम करत आहे. श्रीकांत शिंदे यांनी महायुती सरकारने राबवलेल्या योजनांची उदाहरणे देत सांगितले की, या योजनांमुळे ग्रामीण आणि शहरी भागात मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली आहे. महायुतीचे सरकार सक्षम आणि स्थिर असून, जनतेच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठीच ह्या सरकारमध्ये सामील होण्यासाठी आपल्या हक्काच्या माणसाला गरिबीची जाण असणारे उमेदवार अजित पिंगळे यांना निवडून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी कमी कालावधीत महायुती सरकारने राज्यातील क्रांतिकारी निर्णय घेतले असून शेतकरी, युवा, महिलांना व सर्व घटकांतील नागरिकांची प्रगती होण्याच्या दृष्टीने उपाययोजना केल्या आहेत. या सरकारने अडीच वर्षात अडीच कोटी रुपये जिल्ह्याच्या विकासासाठी दिले असून तुम्ही सर्वांनी उद्या निवडणूकित आपल्या हक्काचा माणूस असलेला अजित पिंगळे यांना विधानसभेत पाठवून आपल्या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करू द्यावे असे आवाहन केले. तर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरज साळुंके म्हणाले की, हे सरकार सर्वसामान्य लोकांचे सरकार आहे. खासदार व आमदार यांनी कसलीही विकासात्मक कामे न करता जिल्ह्याचे वाटोळे केले असल्याचे त्यांनी सांगितले. महायुती सरकारच्या माध्यमातून सामान्य माणसासाठी अनेक जास्त स्वरुपात योजना आणून विकास साधण्यासाठी अजित पिंगळे यांना निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे यांनी हफ्तेखोर विद्यमान आमदारांनी फक्त गोड गोड बोलून स्वतःचा स्वार्थ साधला आहे. कार्यकर्त्यांचा वापर फक्त कामापूरता करायचे अन त्यांना पुन्हा कसलाच त्याला मान सन्मान दयेयचा नाही असा एकपात्री कार्यक्रम त्यांच्याकडून होत आहे. महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांच्याकडून कुठल्याही कार्यकर्त्याला डावलून कोणतेच काम होणार नाही ह्याची मी हमी देतो. त्यासाठी तुम्ही कसल्याही भूल थापांना बळी न पडता भरगोस मतांनी त्यांना निवडून द्यावे अशी विनंती केली. पिंगळे म्हणाले की, विद्यमान आमदार हे केवळ नाटक करून जनतेसमोर निष्ठावंत असल्याचा आव आणत आहे. जनतेला सर्व शिवसेनेचा जुना इतिहास माहीत असून इतिहास माहित नसलेल्यांनी शहाणपणा शिकवू नये. महायुती सरकारच्या धोरणांवर आपला विश्वास व्यक्त केला आणि जनतेने महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी शिवसेना महायुती, मित्रपक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सभेत शिवसेनेत अनेक युवकांनी प्रवेश केला. सभेसाठी मोठ्या प्रमाणावर हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. ज्यामुळे महायुतीचे वाढते जनसमर्थन स्पष्ट दिसून आले.

## सर्वाधिक भ्रष्ट सरकार म्हणून शिंदे, फडणवीस सरकारची नोंद - खा. राजेनिंबाळकर

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – महाराष्ट्रात झालेल्या आजवरच्या सरकारमधील सर्वाधिक भ्रष्ट सरकार म्हणून शिंदे व फडणवीस सरकारची नोंद झाली असल्याची खरमरीत टीका खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी करीत राज्य सरकारचे वाभाडे काढले.

धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळा येथे आयोजित सभेत बोलत होते. यावेळी उमेदवार कैलास पाटील उपस्थित होते. पुढे बोलताना खा राजेनिंबाळकर म्हणाले की, या सरकारने भ्रष्टाचार कुठे आणि किती करावा ? याची परिसिमाच पार केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावावर मोदींनी मते मागितली अन् त्याच युगपुरुषाच्या पुतळ्यामध्ये यांनी भ्रष्टाचार केला, एवढं दुर्लक्ष केलं की हा पुतळा कोसळला. हा फक्त पुतळा कोसळला नाही तर या राज्यातील जनतेच्या विश्वास गळून पडला. याचं जराही दुःख खेद या सरकारला वाटल नाही. पण या जनतेला वाटलेलं दुःख ते मतपेटीतून व्यक्त करतील असा विश्वास खासदार ओमराजे यांनी बोलून दाखविला.



पुढे ते म्हणाले, मोदी हे फक्त गुजरातचे पंतप्रधान असल्यासारखं वागत आहेत, आपल्या राज्यावर ते विशेष प्रेम करतात कारण या राज्यात आलेले मोठे प्रकल्प त्यांनी गुजरातला वळवले. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले यापेक्षा मोठा प्रकल्प राज्यात येणार आहे. पण हाती काय मिळालं तर भला मोठा काशी भोपळा असा टोमणा खा राजेनिंबाळकर यांनी सरकारला मारला. यावेळी आमदार कैलास पाटील यांनीही केंद्र व राज्य सरकारने महाराष्ट्रावर कसा अन्याय केला ? याचा पाढा वाचला. या गावामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे येऊन गेले होते, ती जागा हे भव्य स्मारक म्हणून घोषित झाले. पण त्या संदर्भात असलेली फाईल एक वर्षांपासून मुख्यमंत्री यांच्याकडे पडून आहे. दिवसाला २० हजार सह्या करणाऱ्या मुख्यमंत्री येथे सही करताना कशाची वाट पाहत होते ? असा प्रश्न विचारीत ही फाईल अदानी, अंबानीची नव्हती त्यामुळे सही केली नसेल असाही टोला आ पाटील यांनी लगावला.

## विकसित महाराष्ट्रासाठी महायुतीचे सरकार हवे - डॉ. कराड

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – देशातील काही राज्यात काँग्रेस प्रणित सरकार होते. केवळ योजनांच्या घोषणा केल्या व प्रत्यक्षात जनता आणि राज्याच्या विकासासाठी काहीही न केल्याने जिथे जिथे काँग्रेसची सत्ता होती, तिथे भाजपाचे सरकार आले. २०१४ पासून भाजप शासित स्थिर सरकारमुळे मोठ्या गतीने विकास झाला. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासासाठी देखील महायुतीचेच स्थिर सरकार हवे, त्याशिवाय विकासाला चालना मिळणार नसल्याचे माजी केंद्रीय मंत्री खासदार डॉ. भागवत कराड यांनी दि.१५ नोव्हेंबर रोजी सांगितले.

धाराशिव येथील प्रतिष्ठान भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. मिलिंद पाटील, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, ॲड. खंडेराव चौरे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना खा डॉ. कराड म्हणाले की, २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात स्थिर सरकार होते. त्यावेळी कृषी, सिंचन, वीज, उद्योग, गुंतवणूक, रोजगार आदी क्षेत्रांच्या विकासासाठी भरघोस निधी देवून गतिमान महाराष्ट्रासाठी कामे करण्यात आली. जलयुक्त शिवारमुळे शेत शिवारात पाणी आले. नंतरच्या काळात जनतेने भाजप व शिवसेनेला कौल दिला होता. परंतू खर्चीसाठी उध्दव ठाकरे यांनी



काँग्रेस, राष्ट्रवादीशी हातमिळवणी केली व महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले. अडीच वर्षाच्या काळात केवळ जनहिताच्या आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या योजनांना त्यांनी स्थगिती दिली. त्यानंतर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे महायुती सरकार आले. अडीच वर्षापेक्षा कमी काळात त्यांनी पुन्हा प्रगतशील महाराष्ट्र घडविण्यासाठी कामे केल्याची त्यांनी सांगितले. तसेच शेतकर्यांना एक रूपयात पीक विमा, जलयुक्त शिवार ३.०, लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्य योजना, उद्योजक निर्माण करण्यासाठी केंद्राच्या नवनवीन योजनांची अंमलबजावणी करून महाराष्ट्राचा विकास करून दाखविला. अजून अनेक विकासकामे आणि प्रकल्प मार्गी लागणे बाकी आहे, त्यासाठी राज्यात स्थिर सरकार असणे आवश्यक आहे. जनतेने या बाबीचा विचार करून महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत येण्यासाठी आपले आशीर्वाद महायुतीला द्यावे, असे आवाहन डॉ. कराड यांनी केले.

## महायुती सरकारने लोक कल्याणकारी योजना राबवल्या - पिंगळे

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – महाविकास आघाडीचा खरा उद्देश जातीपातीमध्ये फूट पाडून समाजात भांडणं लावण्याचा दिसून येत आहे. त्यांचे आमदार व खासदार गोड बोलून, खोटी आश्वासने देऊन फक्त वेळ मारून नेण्याचे काम करत आहेत. मात्र, महायुती सरकारने राज्यातील जनतेच्या हितासाठी खऱ्या अर्थाने लोक कल्याणकारी योजना राबवल्या आहेत आणि विकास कामे केली असल्याचे महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांनी सांगितले. धाराशिव विधानसभा मतदार संघाचे उमेदवार पिंगळे हे कळंब तालुक्यातील आवाड शिरपुरा, ताडगाव, सौंदणा (आंबा), वाकडी (इ), लासरा, रांजणी, घारगाव, बोरवंटी या गावात संवाद यात्रेत केले. महायुती सरकारच्या माध्यमातून शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनतेसाठी अनेक योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. राज्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हे सरकार प्रामाणिकपणे कार्यरत असून, समाजातील सर्व घटकांना समृद्ध आणि सशक्त बनवण्याचा आमचा दृढ निश्चय आहे. त्यामुळे येणाऱ्या २० तारखेला धनुष्य बाणावरील पहिल्या क्रमांकावर मतदारांनी मते देवून विधानसभेत आपले प्रतिनिधित्व करण्याची संधी द्यावी असे आवाहन पिंगळे यांनी आवाड शिरपुरा, ताडगाव, सौंदणा (आंबा), वाकडी (इ), लासरा, रांजणी, घारगाव, बोरवंटी या गावात संवाद यात्रे दरम्यान केले. यावेळी कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामहारी शिंदे, उमेश कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवाजी लकडे, शिवसेनेचे अनंत वाघमारे, कळंब पंचायत समितीचे माजी सभापती दत्तात्रय साळुंके, डॉ.सरोजनी राऊत यांच्यासह मतदार मोठया संख्येने व शिवसेना महायुती, घटक पक्षातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थिते होते.

# मांजरा शुगर इंडस्ट्रीज कारखान्याच्या दुसऱ्या गळीत हंगामाचा शुभारंभ




धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रा. लि., कारखान्याच्या दुसरा गळीत हंगाम व बॉयलर अग्नि प्रदिपनचा शुभारंभ दिपशीखा धिरज देशमुख यांच्या हस्ते दि.१४ नोव्हेंबर रोजी करण्यात आला.

मांजरा परिवाराचे मार्गदर्शक सहकार महर्षी व महाराष्ट्राचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मांजरा शुगर इंडस्ट्रीज कारखान्याची वाटचाल सुरू असून कारखान्याच्या गाळप हंगाम सन २०२४-२५ चा दुसऱ्या गळीत हंगामाचा शुभारंभ दिपशीखा देशमुख व कार्यक्षेत्रातील शेतकरी यांच्या हस्ते मोळी पूजन करून झाला. यावेळी विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडीत देसाई, जागृती शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीजचे जनरल मॅनेजर गणेश येवले, संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक रविशंकर बरमदे उपस्थितीत होते.

यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे म्हणाले, कारखान्याने मागील हंगाम यशस्वीरित्या पूर्ण केला असून, चालू हंगाम सन २०२४- २५ मध्ये उदिष्टाप्रमाणे गाळप होणेसाठी कारखान्याने आवश्यक ती सर्व तयारी केली आहे. मांजरा परिवार व शेतकजयांचे असलेले विश्वासाचे अतुट नाते आहे. याचा विचार करता कारखान्याकडे नोंदलेला सभासद व बिगर सभासद यांचा संपूर्ण ऊस गाळपास येणेसाठी सक्षम अशी ऊस तोड, वाहतूक यंत्रणा भरती करण्यात आली आहे. चालू गाळप हंगामात कारखाना पूर्ण क्षमतेने चालणार असून, त्यासाठी आवश्यक ती मशिनरी दुरूस्ती व आधुनिकीकरणाची कामे करण्यात आली आहेत. कारखाना व्यवस्थापनाने कार्यक्षेत्र व भागातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्याचा सार्थ हेतू विचारात घेऊन कारखान्यामार्फत प्रभावीपणे राबविण्यात येत असलेल्या ऊस विकास योजनेला शेतकऱ्यांचा मोठ्या प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कारखाना राबवित असलेल्या विविध ऊस विकास योजनेचा लाभ घ्यावा व चालू गळीत हंगामात कारखान्यास जास्तीत जास्त ऊस पुरवठा करुन सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोड, वाहतूक ठेकेदार, कारखान्याचे जनरल मॅनेजर (टेक्नीकल) अजित कदम यांच्यासह खाते प्रमुख, विभाग प्रमुख व कर्मचारी, कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जाहीर खुलासा**

दैनिक यशवंत या वृत्तपत्रात दि.१४ नोव्हेंबर रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल मोटे यांच्या प्रचाराचा शुभारंभ कार्यक्रमाच्या बातमीमध्ये महायुतीचे उमेदवार प्रा. डॉ.तानाजीराव सावंत यांच्या शिवसेना कार्यक्रमाचा फोटो नजर चुकीने लागलेला आहे. त्याबद्दल दिलगिर आहोत.

**मल्लिकार्जुन सोनवणे**
**जिल्हा प्रतिनिधी**

# ठाकरे सरकारला जे जमले नाही ते महायुतीने करून दाखवले - आ. पाटील



धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – धाराशिव जिल्ह्यासाठी महत्वपूर्ण असलेल्या अनेक प्रकल्प आणि योजनांचे काम महायुती सरकारने साकारले आहे. उध्दव ठाकरे मुख्यमंत्री असताना महाविकास आघाडीला जे जमले नाही, ते महायुतीने करून दाखवले आहे. केवळ तालुक्याचाच नव्हे, तर संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी आवश्यक असलेले ऐतिहासिक निर्णय यापूर्वीच महायुतीने सरकारने घेतले आहेत. त्यामुळे आता तालुक्याचा आणि जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलल्याशिवाय राहणार नाही, अशा शब्दात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी विश्वास व्यक्त केला.

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे आयोजित करण्यात आलेल्या जाहीर प्रचार सभेत ते बोलत होते. सिंचनाच्या दृष्टिने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या कृष्णा खोर्याच्या हक्काच्या पाण्याचा निर्णय २३ वर्षांपूर्वी डॉ. पद्मसिंह पाटील यांनी आपले राजकीय वर्चस्व पणाला लावून मंजूर करून घेतला. महायुती सरकारने त्यासाठी आता ११ हजार ७०० कोटी रूपयांची मान्यता दिली आहे. आपल्या जिल्ह्यातील आठही तालुक्यांना या पाण्याचा फायदा होणार आहे. तुळजापूर तालुक्यातील सिंचन क्षेत्रात भर पडणार आहे. डॉ. पद्मसिंह पाटील यांनी सुरू केलेले हे काम आपण मोठ्या जबाबदारीने पूर्णत्वाकडे आणले असल्याचेही आमदार पाटील यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील पहिली बसवसृष्टी नळदुर्ग येथे आपण साकारत आहोत. त्यासाठी ५ एकर जागा उपलब्ध झाली असून ५ कोटींचा निधीही मंजूर झाला आहे. हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या स्मारकासाठीही अडीच कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. नळदुर्ग येथे शादीखाना उभारण्यासाठी दोन कोटी उपलब्ध झाले असून या कामाचे भूमिपूजनही पूर्ण झाले आहे. जळकोट येथील बाबनवली दर्ग्यासाठी १० लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तुळजापूर शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे भव्य स्मारक उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्या ठिकाणी ५० कोटी रूपयांचे प्रशिक्षण केंद्र उभारले जाणार आहे. तुळजाभवानी मंदिर समितीच्या स्वनिधीतून ६० कोटी रूपयांची कामे सुरू केली आहेत. त्यातून मंदिराचा जीर्णोध्दार आणि मुख्य महाद्वारासह शहरात भव्य कमानी साकारल्या जाणार आहेत. अनेक महत्वपूर्ण प्रकल्प अंतिम टप्प्यात आहेत. काही प्रगतीपथावर आहेत. तर उर्वरित योजना आणि प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची आणि सोबतीची आवश्यकता आहे. महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या कालावधीत आपल्याला काय मिळाले, याचा सर्वांनी विचार करावा. महायुती सरकारच्या अडीच वर्षांच्या काळात धाराशिव जिल्हा आणि आपल्या मतदारसंघात काय केले, याचा कार्य अहवाल आपल्या सर्वांसमोर मांडला असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले. यावेळी नंदगाव येथील ४० जणांनी आ पाटील यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. जळकोटसह हंगरगा, बोरगाव, लोहगाव, मुर्टा, होर्टी, किलज, सलगरा यासह तांडे आणि वाड्या-वस्त्यावरील नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

## ६६ कोटींचा मावेजा मंजरीबद्दल गडकरींचे धन्यवाद

ज्यांची जमीन नळदुर्ग-अक्कलकोट महामार्गाच्या रूंदीकरणासाठी संपादीत केली आहे, त्या शेतकरी कुटुंबीयांचे नुकसान होऊ नये. या उदात्त भावनेने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी ६६ कोटी रूपयांचा मावेजा देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या मार्गावरील शेतकरी बांधवांसाठी मोठ्या तळमळीने गडकरी यांनी घेतलेल्या या क्रांतीकारी निर्णयाबद्दल आ पाटील यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## संपादकीय

# बुलडोझर अन्यायाला चाप

देशात घटना व कायद्याचे राज्य आहे. मात्र बहुमताच्या बळावर भाजप बहुसंख्याकवादी कार्यक्रम राबवत आहे. कथित बुलडोझर न्यायामुळे जे बेघर झाले त्यांचे पुनर्वसन कोण व कधी करणार ?

योग्य प्रक्रियेचे पालन न करता कोणाही नागरिकाची मालमत्ता उद्ध्वस्त करणे हे कायद्याच्या विरोधी वर्तन आहे असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्याचे स्वागत केले पाहिजे. बेकायदेशीरपणे घर वा अन्य मालमत्ता पाडण्यात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांना या बद्दल जबाबदार धरून त्यांच्याकडून ती मालमत्ता पुन्हा उभारण्याचा खर्च वसूल करावा हा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश यापुढे असे प्रकार घडण्यापासून रोखू शकेल. कोणी एक व्यक्ती एखाद्या गुन्ह्यात गुंतली असेल अथवा तसा संशय असेल तर त्या व्यक्तीचे घर पाडणे म्हणजे त्या व्यक्तीस शिक्षाफ देण्यासारखे आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. जेव्हा एखादी मालमत्ता अचानकपणे पाडण्यासाठी निवडली जाते; पण त्या परिसरातील अन्य मालमत्तांना हात लावला जात नाही तेव्हा त्या मागे दुष्ट हेतुफ असल्याचा संशय बळावतो, असे मत न्यायालयाने नोंदवले आहे. एखादी मालमत्ता पाडण्यापूर्वी संबंधितांना सूचना (नोटीस) देण्यासह अनेक अटी सर्वोच्च न्यायालयाने घातल्या आहेत. एखाद्या गुन्ह्यातील आरोपीचे किंवा संशयिताचे घर बुलडोझरने जमीनदोस्त करण्याच्या प्रकारांना यामुळे आळा बसेल. हा निर्णय चांगला असला तरी अशा कारवाईत ज्यांनी घरे, दुकाने गमावली आहेत त्यांना केवळ दिलासा मिळेल.

सरकार न्यायाधीश नव्हे

कथित बुलडोझर न्यायफ वापरण्यास उत्तर प्रदेशात सुरुवात झाली. २०१७च्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष सत्तेत आला व आदित्यनाथ मुख्यमंत्री बनले. कोणत्याही प्रकरणात आरोपी असलेल्या व्यक्तीचे घर पाडण्यास त्यांनी बुलडोझर या यंत्राचा वापर सुरु केला. सरकारी जमिनीवरील अतिक्रमण काढण्यासाठी आदित्यनाथ यांनी या यंत्राचा बेफाम वापर केला. २०२२मध्ये निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी या यंत्राचा उपयोग केला. त्यामुळे त्यांना बुलडोझर बाबाफ हे नामाभिधान मिळाले. ते पुन्हा मुख्यमंत्री बनले आणि बुलडोझरचा वापर सुरु राहिला. त्याच वर्षी मध्य प्रदेशात भाजप सत्तेत आला आणि तेथेही बुलडोझरचा वापर सुरु झाला. एखाद्या प्रकरणात कोणी संशयित आरोपी असला, त्याच्यावर खटला चाललेला नसला व तो गुन्हेगार असल्याचे सिद्ध झाले नसले तरी त्याची मालमत्ता पाडण्याची कारवाई झाली. भाजपची सत्ता असलेल्या राज्यात ही कारवाई झाली. महाराष्ट्रातही या वर्षी अशी कारवाई झाली. घरात गोमांस ठेवल्याच्या संशयाफ्वरून घर पाडण्याची उदाहरणे आहेत. दिल्लीत झालेल्या दंगलीनंतर संशयितांची घरे पाडण्यात आली. मुस्लिम समाजातील व्यक्तींची घरे किंवा दुकाने जास्त संख्येने पाडली गेल्याचे आकडेवारी दाखवते. अशा कारवाईत २०२३पर्यंत ५ लाखांपेक्षा जास्त नागरिक बेघर झाले. ते सर्व गुन्हेगार, दंगल घडवणारे होते का? हा प्रश्न आहे. सर्वोच्च न्यायालयाने ताजा निकाल देताना, कार्यपालिका (सरकार) न्यायाधीश बनू शकत नाही आणि केवळ आरोप असलेल्या व्यक्तीस दोषी ठरवून त्याचे घर पाडून शिक्षा देऊ शकत नाही, असे स्पष्टपणे बजावले आहे. कारण अशा प्रकरणात त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांनाही शिक्षा दिली जाते हे न्यायालयाने दाखवून दिले आहे. सरकार व न्याय संस्था यांचे अधिकार स्पष्ट करणारा हा निकाल आहे. सरकारने शिक्षा देण्याने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे उल्लंघन होते हा येथे महत्त्वाचा मुद्दा आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल व त्या मागील तत्त्व गाव पातळीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. गेल्या दहा वर्षांत सरकारनेच न्यायाधीशाची भूमिका बजावण्याची अनेक उदाहरणे समोर आली. बुलडोझरच्या वापराला राजकीय पैलू प्राप्त झाला आहे. काँग्रेसच्या सरकारने जे केले नाही ते आम्ही केले असा छुपा किंवा उघड प्रचार त्यातून झाला. काँग्रेस अल्पसंख्याकांचा अनुनय करत असल्याचा जुना आरोप पुन्हा करण्याची संधी भाजपने या कृत्याने साधली. सत्तेत कोणीही असले तरी नैसर्गिक न्याय, गुन्हा सिद्ध होईपर्यंत सर्व निर्दोष आहेत हे न्यायाचे तत्त्व यांचे पालन होणे आवश्यक आहे. या निकालाने एका अन्यायाला चाप बसेल अशी आशा आहे.

# लॉन्ड्री सेवा आणि ग्राहक



ड्राय क्लीनिंगचे कपडे जेव्हा ग्राहकाला परत दिले जातात तेव्हा ते बंद पॅकेजमध्ये असतात. आपणही सर्वांनी हे अनुभवले असेलच. परत घेतलेले कपडे हे जाड तपकिरी कागद, प्लास्टिक किंवा वर्तमानपत्रात गुंडाळून दोऱ्याने बांधून दिले जातात. मात्र लाँड्रीतून आणलेले हे कपडे आपण त्याचवेळी पाहात नाही. दोन दिवसांनी हे पॅकिंग उघडतो तेव्हा त्यात बरेच कपडे हे फाटलेले, डाग लागलेले आणि गहाळ झालेल असतील तर? काय कराल तर निडरपणे ग्राहक न्यायालयात आपली तक्रार मांडा आणि न्याय मिळवा. कसा तो या लेखातून वाचा

अंजली पोतदार

नवरात्र, दिवाळी असे सणांचे दिवस संपले. सण म्हटले की, छान छान रेशमी महागातले कपडे घालून मिरवणे आलेच. एका ट्रेनच्या प्रवासात या छान छान कपड्यांविषयी बोलणे चालू होते. बापरे! आता घरी जाऊन धोबीघाट काढावा लागणार. बॅगेतले कपडे लाँड्रीला द्यावे लागणार. तो खर्चही किती वाढलाय वगैरे. यांची कटकट असते. घरी धुता येत नाहीत. मग ड्राय क्लीनिंग, वॉशिंग, इस्त्री यासाठी लॉन्ड्रीवर अवलंबून राहावे लागते. तसेच सुट्ट्यांमधील ट्रीपवरून आल्यावर सुद्धा जाकीट, सूट, स्वेटशर्ट हे देखील ड्राय क्लीनिंगला द्यावे लागतात. अशाच एका ट्रीपवरून येताना आमचे आपापसात बोलणे चालू होते. ही सर्व चर्चा समोर बसलेले एक गृहस्थ ऐकत होते. ते म्हणाले तुम्ही लाँड्रीबद्दल बोलत आहात तर तुम्हाला एक खरी घडलेली गोष्ट सांगू का? गोष्ट म्हटल्यावर आम्हीही सरसावून बसलो. ही गोष्ट घडली गोव्यात. श्री गुरुदास यांनी गोम्स लाँड्रीत २० एप्रिल रोजी कपड्यांच्या ३ जोड्या ड्राय क्लीनिंगसाठी दिल्या. कपडे त्यांनी एका लग्नासाठी मुंबईतून खरेदी केले होते. ते रेशमी आणि महागातले होते. त्यांना लाँड्रीतून बिल दिले गेले आणि कपडे २५ तारखेला मिळतील असे सांगितले. गुरुदास २५ तारखेला कपडे आणण्यासाठी लाँड्रीत गेले तेव्हा कपडे तयार नव्हते. ते २८ तारखेला मिळतील असे सांगितले. त्यानुसार गुरुदास २८ तारखेला जाऊन कपडे घेऊन घरी आले. घरी येऊन सर्व आटोपल्यावर कपडे कपाटात ठेवताना उघडले तर कपड्यांची एक जोडी गायब झालेली, तर दुसरे कपडे फाटलेले आणि जळालेले दिसले. आता एवढ्या रात्री लाँड्री तर बंद झालेली. म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी बिलावरील नंबर पाहून त्यांनी लाँड्रीत फोन केला. लाँड्री मालकाने जरा उडवाउडवीच केली. म्हणून गुरुदास दुसऱ्या दिवशी लाँड्रीत गेले. सर्व कपडे दाखवून जाब विचारला. त्यावर मालकाने जळलेल्या, फाटलेल्या कुर्ता, पायजाम्याच्या बाबतीत झालेला निष्काळजीपणा मान्य केला. तेवढ्याची भरपाई देण्याची तयारीही दाखवली. पण गहाळ झालेल्या कपड्याची जबाबदारी घेण्याचे टाळले. त्याने गुरुदास यांचे बिल काढले आणि त्यावर बारीक अक्षरात लिहिलेली अट दाखवली. ती होती कपडा खराब अथवा गहाळ झाल्यास आमची जबाबदारी रु. १००/-पर्यंत मर्यादित असेल.' त्यामुळे तो फक्त तेवढेच पैसे देऊ शकेल असेही सांगितले.

गुरुदास यांनी परत परत समजावूनही लाँड्री मालक काही ऐकण्यास तयार नव्हता. शेवटी नाईलाजाने गुरुदास यांनी गोवा राज्य ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली. तक्रारीत त्यांनी कपड्यांची किंमत अकरा हजार तीनशे पंच्याहत्तर रुपये लिहिली होती. सोबत खरेदीचे बिलही जोडलेले. कपड्यांचे नुकसान झाल्याबद्दल रु. १५०००/- आणि जो मानसिक त्रास झाला त्याबद्दल रु. ५००००/- नुकसानभरपाई मिळावी अशीही मागणी केलेली. या फिर्यादींविरुद्धच्या बचावात लाँड्रीच्या वकिलांनी असा दावा केला की, त्यांच्या आशिलाकडून कोणताही निष्काळजीपणा झालेला नाही. उलट गुरुदास यांनी २५ तारखेलाच कपडे परत नेले. तसेच गुरुदास यांनी ड्राय क्लीनिंगला घेतलेल्या कपड्यांसाठी लाँड्रीकडे विमा संरक्षण आहे का अशीही चौकशी केली होती. याचाच अर्थ ते विमा कंपनीविरुद्ध दावा दाखल करून रक्कम वसूल करू इच्छित होते. गुरुदास यांना दिलेल्या पावतीवरची अट मान्य करूनच कपडे ड्राय क्लीनिंगला दिले होते. याअर्थी लाँड्रीच्या सेवेत कोणतीही कमतरता नव्हती. कपड्यांची डिलिव्हरी घेण्याआधी गुरुदास यांनी कपडे तपासूनही पहिले होते. त्यांचा पुढचा युक्तिवाद असा होता की एकदा ग्राहकाने कपड्यांची डिलिव्हरी घेऊन कपडे नेले की लाँड्रीला त्यापुढे जबाबदार ठरवू शकत नाही. राज्य आयोगाने दोन्ही पक्षांची सर्व लेखी निवेदने, प्रतिज्ञापत्रे आणि युक्तिवाद तपासले. इथे महत्त्वाची गोष्ट म्हणजे ग्राहक आयोगासमोर प्रत्येक गोष्ट/घटना संपूर्ण संशयातीत असल्याचे सिद्ध करणे आवश्यक नसते. खून किंवा मोठ्या गुन्ह्यामध्ये असा अविवादीत पुरावा आवश्यक असतो. कारण अशा प्रकरणांमध्ये आरोपीच्या स्वातंत्र्याचा किंवा आयुष्याचा प्रश्न असतो. त्यामुळे ग्राहक न्यायालयातील निर्णय हे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांवर, परिस्थितीनुसार काढलेल्या निष्कर्षांवर आणि व्यावहारिक दृष्टिकोन समोर ठेवून घेतले जातात.

ड्राय क्लीनिंगचे कपडे जेव्हा ग्राहकाला परत दिले जातात तेव्हा ते बंद पॅकेजमध्ये असतात असे खुद्द लाँड्रीनेच कबूल केले होते. आपणही सर्वांनी हे अनुभवले असेलच. परत घेतलेले कपडे हे जाड तपकिरी कागद, प्लास्टिक किंवा वर्तमानपत्रात गुंडाळून दोऱ्याने बांधून दिले जातात. साधारणतः हे पॅकिंग आपण उघडून बटन तुटलेले, फाटलेले जळलेले आहेत का हे लाँड्रीत तपासत नाही. असे केले तर इस्त्री केल्याचा काय उपयोग? फार तर एका कोपऱ्यातून कपडे आपलेच आहेत ना हे तपासून बघतो. बाकी गोष्टी घरी आल्यावरच कळतात. त्यामुळे गुरुदास यांनी डिलिव्हरी घेताना कपडे तपासून घेतले हा लाँड्रीच्या वकिलांचा दावा फोल ठरला. दुसरे म्हणजे पावतीवर बारीक अक्षरात छापलेली एकतर्फी अट ग्राहक कायद्यास मान्यच नाही. या सर्व बाबींचा विचार करता ग्राहक आयोगाने गुरुदास यांची तक्रार ग्राह्य ठरवून लाँड्रीच्या सेवेत खरोखरच कमतरता होती असा निर्णय दिला. लाँड्री मालकांनी गुरुदास यांना गहाळ आणि खराब झालेल्या कपड्याची किंमत अकरा हजार तीनशे पंच्याहत्तर रुपये देण्याचे निर्देश दिले. तसेच रु. १५०००/- नुकसान भरपाई देण्याचेही आदेश दिले. ही सगळी रक्कम ३० दिवसांच्या आत नाही दिली तर त्यापुढील कालावधीसाठी दंडात्मक व्याज आकारण्यात येईल अशी ताकीद देण्यात आली. ही गोष्ट ऐकल्यावर मी त्या गृहस्थांना विचारले की, तुम्हाला एवढे सविस्तरपणे कसे काय माहीत? तर त्यांनी सांगितले की, ते स्वतःच गोवा राज्य आयोगाचे निवृत्त अध्यक्ष होते. थोडक्यात काय? जिथे ग्राहक न्यायालयाच्या अध्यक्षांनाही न्यायालयाची पायरी चढावी लागते तिथे सामान्य ग्राहकाची काय कथा? त्यामुळे न घाबरता, निडरपणे ग्राहक न्यायालयात आपली तक्रार मांडा आणि न्याय मिळवा.

# बालपण एक आठवणीतली सहल

आयुष्यात अनुभवलेली सहल प्रत्येकासाठी एक सुंदर अनुभव असतो. कोण्याएका संध्याकाळी त्या एका शांतसमयी या आठवणी ताज्या होतात आणि हळूच अंग मोहरून जातं. तसंच बालपणाचं आहे. बालपण' ही एक आठवणीतली सहल. ही सहल आणि त्या सहलीतला प्रत्येक टप्पा आपल्यासाठी आठवणींची ओंजळ असते. ती जपत ही सहल आयुष्यभर आपण एन्जॉय करतो. खूप सखाचे क्षण असतात या सहलीत. आज बालदीनानिमित्त या सहलीतल्या सुखद आठवणी जगताना

साक्षी रूपाली दिलीप माने



बाल युवा दोस्तांनो आज तुमचाच खास दिन, म्हणजेच बालदिन' अर्थात चिल्ड्रन्स डे'. या बालदिनाच्या तुम्हा सर्वांना खूप-खूप शुभेच्छा! या दिवसाचा इतिहास डोकावून पाहिला तर भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे बालकांविषयी असणारे प्रेम प्रत्येक पिढीपर्यंत पोहोचावे म्हणून १४ नोव्हेंबर हा त्यांचा जन्मदिवस बालदिनाच्या रूपात साजरा केला जातो, हे आपल्या सर्वांनाच ठाऊक आहे. लहान मुले ही पंडितजींच्या हृदयातला एक अमूल्य ठेवा होता. चळवळी आणि राजकारणाच्या धबडग्यात ते केवळ बच्चेकंपनीमध्ये रमायचे आणि मुलांनाही चाचा नेहरू' अगदीच जवळचे वाटायचे. दरवर्षी विशेषत: बालदिनानिमित्त शाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी मुले त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करतात. त्यांच्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. मुलांना नृत्य, गाण्याची आणि भाषणे देण्याची संधी मिळते. तसेच लहान मुले ही कायमच त्यांच्या आगळ्यावेगळ्या कलागुणांनी सर्वांनाच आकर्षित करतात. जशी नेहरूजींना मुले आवडायची तशी आपल्या प्रत्येकालाच आवडतात. म्हणतात ना लहान मुलं ही देवाघरची फुलं असतात हे अगदी खरं आहे, त्यात काडीमात्र शंका नाही. एखादे मूल आपल्यासमोर हसत जरी असेल तर त्याला पाहून आपल्यालाही हसू येते आणि सहजच आपल्या लहानपणीच्या आठवणी जाग्या होतात.लहानपण ही एक वारंवार हवीशी वाटणारी सहल असते. जसं आपण एखाद्या सहलीला मनमुरादपणे मज्जा, धमाल करतो असेच आपले बालपण; परंतु या सहलीचा कितीही वन्स मोअर' हवासा वाटत असला तरी पुन्हा जसाच्या तसा अनुभवणे शक्य होत नाही. बालपण हा आयुष्यातला सर्वात सुंदर टप्पा असतो, याबद्दल तर काहीच किंतु नाही. वयाचा कोणत्याही आकडा पार केला तरी लहानपणीच्या आठवणी काही पाठ सोडत नाहीत. लहानपणी केलेल्या चुका, आईचा मार, बाबांचा ओरडा, मित्र-मैत्रिणींसोबतची कट्टी-बट्टी, भूत-भूत, भांडीकुंडी, लपाछुपी, शाळेत न जाण्यासाठी केलेली कारणं, आई आज पोट दुखतंय गं असं म्हणत शाळेला मारलेली बुट्टी, कमी मार्क आल्यावर थोडसं बोललेलं खोटं आणि इतकंच नव्हे तर खेळता-खेळता आपण कुठे पडलो त्याच्या खुणा, मोठं होऊन डॉक्टर, पोलीस, टीचर बनायची स्वप्न शेवटच्या क्षणापर्यंत काही साथ सोडत नाहीत. या गोष्टी ही सारी स्वप्नं कायम आठवणींचे घर करून आपल्यासोबत राहतात.एका विशिष्ट वयानंतर आपण मोठे होतो. जबाबदारी वाढते आणि नकळत खांद्यावर त्याचे दप्तर घेऊन एका वेगळ्याच प्रवासाला सुरुवात होते. मग तो अल्लडपणा, निरागसपणा, मज्जा-मस्ती या गोष्टी करणारे ते लहान मूल हळूहळू नाहीसं होऊ लागतं आणि एका नवीन गोष्टीशी आपली मैत्री होते. ती नवीन मैत्री म्हणजेच परिपक्वता किंवा समंजसपणा आणि सर्वांना सोयीस्कर असं म्हणायला गेलं तर मॅच्युरिटी. ही मैत्री गरजेची असते; परंतु या मैत्रीमुळे खूप गोष्टी सहज आपल्याकडून सुटत जातात आणि एक वेगळीच रेस सुरू होते. या स्पर्धेत सगळ्यांनाच पहिल्या क्रमांकावर यायचे असते. यासाठी रक्ताचे पाणी करून मेहनत करायची तयारी, जिद्द, चिकाटी आपोआप प्रत्येकामध्ये येते. हीच गोष्ट पिढ्यान-पिढ्या सुरू आहे, पण या सर्व गोष्टींमध्ये आपल्यातलं ते लहान मूल केव्हाच हरवून गेलेलं असतं.मान्य आहे परिवर्तन गरजेचं असतं, मोठं होऊन समोर येणारी जबाबदारी पूर्ण करणे हे कर्तव्य असतं पण आपल्यातलं लहान मूल कायम जपणं देखील तितकंच गरजेचं आहे. या धकाधकीच्या जीवनामध्ये एक ब्रेक अत्यावश्यक आहे. कधी तरी आपल्यातलं ते लहान मूल पुन्हा हसताना, खेळताना, धडपडताना, चिडवताना दिसलं पाहिजे. रोज तर शक्य नाही प्रत्येकाने पण एक दिवस बालपणीच्या आठवणींमध्ये नाही तर प्रत्यक्षात बालपण जगले पाहिजे. हे सगळ्यांनाच करता आलं पाहिजे. आपल्या मुलांना तर मनमुरादपणे त्यांच्या या गोड क्षणांचा आस्वाद घेऊ द्या, पण कधी तरी तुम्ही लहान होऊन आपल्या बालपणीची ती हवीहवीशी वाटणारी सहल नक्कीच एकदा तरी करू या.

## उपदेशकथा
## फसवी नक्कल

एक नकलाकार अनेकांच्या नकला करून दाखवित होता. प्रेक्षक खूष होते. त्यांनी त्याला डुकराच्या पिलाचा आवाज काढण्यास सांगितले. त्याने तसा आवाज काढला. प्रेक्षकांनाही तो आवडला. ते त्याचे कौतुक करू लागले. इतक्यात एक घोंगडीवाला गावकरी म्हणाला, 'ही नक्कल बरोबर साधली नाही.' प्रेक्षक त्याला म्हणाले, 'मग तू करून दाखव ना' तो रंगमंचावर आला. घोंगडे अंगावर घेतले आणि आवाज काढू लागला. तर प्रेक्षकांनी त्याची खिल्ली उडविली. हेटाळणी केली तेव्हा त्याने घोंगडीत लपवलेले डुकराचे पिलू बाहेर काढले व म्हणाला, 'देखाव्याला भुलणारे तुम्ही लोक. अहो मी घोंगड्यात डुकराचे पिलू लपवून लपवून त्याला चिमटे घेत होतो. ते ओरडत होते तर तुम्ही प्रत्यक्ष डुकराच्या पिलाचा आवाज खोटा ठरवलात. अन् भ्रष्ट नक्कल खरी ठरवलीत. धन्य !'

******

**कथा उपदेश :**
खोट्या गोष्टींना भुलू नका.




## राशी भविष्य



राशी भविष्य
१६ नोव्हेंबर २०२४ (पीएसआय)

मेष: शुभ रंग:काळा, शुभ दिशा : उत्तर
आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याचे योग आहेत. प्रतिष्ठीत व्यक्तिशी संबंध वाढतील. मुलांची प्रगती राहील. जोखमीचे कामे आज करू नका.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
व्यवसायात अनकुल असे यश मिळेल. कौटुंबामध्ये सुख व शांतीचे वातावरण लाभेल. कोणावरही अंध विश्वास बाळगू नका.

मिथुन :शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
नौकरीमध्ये इच्छे प्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. आपल्या कामाचे कौतुक होईल. फुकटचा मोठेपणा टाळा.

कर्क : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
अचानक धन मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायीक वाद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येईल. अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. दुसऱ्याला दुखवू नका.

सिंह : शुभ रंग: पांढरा, शुभ रंग: पूर्व
योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे परंतु त्याच प्रमाणे उत्पन्न राहील. प्रत्येक्ष क्षेत्रात मान सन्मान मिळेल. कोणतेही काम जबाबदारीने करा.

कन्या : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम
कोणत्यातरी कामात मिळालेले यश आपल्यास फायदेशीर राहणार आहे. घराची अडचण दूर होईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. रागावर नियंत्रण हवे.

तुळ: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम
मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल. आखलेल्या योजना पूर्ण होणार नाही. प्रवास त्रासदायक राहील.

वृश्चिक: शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम
प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो. व्यापारात नवीन प्रस्ताव येतील. मुलांच्या कामाकडे लक्ष राहू द्या. सुखकारक प्रवास घडेल.

धनु: शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व
काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. फायदेशीर व्यवहार राहतील. कौटुंबिक वातावरण चांगले राहिल. समाजात प्रतीष्ठा वाढेल. मशीन वहान सावधपूर्वक हाताळा.

मकर : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: उत्तर
विरोधकांवर मात केल्यामुळे आपल्या किर्तीत वाढ होईल. व्यापाराचे क्षेत्र विस्तृत होईल. जीवन साथीशी चांगले संबंध राहतील. आरोग्याची काळजी घ्या.

कुंभ: शुभ रंग: पिवळा: शुभ दिशा: पूर्व
आपल्या आपक्षेप्रमाणे फळ मिळणार आहे. चैनीच्या वस्तू खरेदी करण्याचा योग आहे.जवळच्या व्यक्तीच्या आरोग्याची काळजी राहील.

मीन : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पूर्व
कौटुंबिक वातावरण आनंदी राहील, कामामध्ये मन लागणार नाही. स्वाभिमान व अहंकार यामध्ये अंतर राखा. आर्थिक स्थिती बिकट राहील.

१६ नोव्हेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव :तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, शुक्र, नेपच्यून व मंगळाचा प्रभाव आहे. तुमच्याकडे प्रचंड उत्साह व आत्मविश्वासाचा साठा आहे. कोणतेही काम तुम्ही प्रथम उत्साहाने सुरू करता. पण त्यात अडचण, अपयश आल्यास ते तुम्ही मनाला लावून घेता. तुम्ही संवेदनाक्षम आहात. इतरांची दु:खे, वेदना दूर करण्यात तुम्हाला आनंद वाटतो. इतरांशी तुम्ही तात्काळ समरस होता. बऱ्याच घटनांची तुम्हाला स्वप्नाद्वारे पूर्वसूचना मिळते. जीवनातील गूढ, अतर्क्य घटनांचा अभ्यास तुम्हाला आवश्यक वाटतो. अपयशामुळे औदासीन्य आल्यास आपल्या कोशात गुरफटून घेऊ नका. जलाशयाच्या काठी, निसर्गसहवासात जाऊन बसल्यास परत उल्हासित मनाने काम करू शकाल. मादक द्रव्ये, मद्यपान वगैरे व्यसनांपासून दूर रहा. मनोबल वाढवण्यासाठी उपासना, ध्यानधारणेचा आश्रय घ्या.

कार्यक्षेत्र : कोणत्याही भूमिकेत प्रवेश करण्याची क्षमता अंगी असल्याने रेडिओ, नाटक, दूरदर्शन वगैरे कलाक्षेत्रात उत्कृष्ट निर्मिती, अभिनय करू शकाल. मानसशास्त्राची प्रगत पदविका घेऊन मनोविकार तज्ज्ञ, मनोविषक म्हणूनही कामगिरी करता येईल. विवाहपूर्व वा विवाहोत्तर समस्या समुपदेशक, सल्लागार बनू शकाल. पाणीपुरवठा, जलक्रीडेची स्थाने ही अनुकूल क्षेत्रे आहेत.

प्रणयी जीवन : तुमचा स्वभाव हळवा असल्याने तुमच्या भावना सखोलपणे समजून घेणारा जोडीदार तुम्हाला हवा असतो. सर्वस्वी बुध्दीच्या आधारावर आपल्या जीवनाची रचना करू पाहणाऱ्या व्यक्तींपेक्षा प्रेमळ, दयाळू व्यक्तीबद्दल तुम्हाला जास्त आकर्षण वाटते. ऑक्टोबर २३ ते नोव्हेंबर २२ मधील व्यक्ती टाळा. जून २१ ते जुलै २० मधील व्यक्ती निवडा.


वर्षफळ : काही गुप्त माहितीचा व अंत:स्फूर्तीचा फायदा मिळेल. शेअरबाजारात मोठे घबाड हाती लागेल. डिसेंबर जानेवारी मध्ये कार्यालयात केलेल्या कष्टांचे चीज होईल. मार्च एप्रिल मध्ये प्रशिक्षणाची संधी चालून येईल. मे जून मध्ये विनासायास धनप्राप्तीचे योग आहेत. जुलै ऑगस्ट मध्ये आकर्षक व्यक्तींशी संवाद साधाल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये भागीदारीचा प्रस्ताव येऊ शकेल.

महत्वाचे वर्ष : ७, १६, २५, ३४, ४३, ५२, ६१, ७०.
भाग्यरत्न : लसण्या
याच तारेखेची व्यक्ती : झाशीची राणी लक्ष्मीबाई, डॉ. श्रीराम लागू, सॅम पित्रोदा, वकार युनुस

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# माझ्याकडे पुढची फक्त १० वर्ष आमिर खानचं मोठं वक्तव्य



बॉलिवूड अभिनेता आमिर खानचा उल्लेख केला की सगळ्यांच्या समोर पर्फेक्शनिस्ट हाच शब्द येतो. आमिर एकामागे एक असे चित्रपट करत नाही. पण तुम्हाला माहित आहे का की आमिर खाननं सांगितलं होतं की त्याच्याकडे काम करण्यासाठी फक्त १० वर्षच उरली आहेत. त्याच्याकडे कमी वेळ राहिला आहे, त्यामुळे तो त्याच्याकडे असलेला काळ हा चांगल्या पद्धतीनं वापरत आहे.


आमिर खाननं 'द हॉलिवूड रिपोर्टर इंडिया' ला दिलेल्या मुलाखतीत त्याच्याकडे काम करण्यासाठी कमी वेळ असल्याचं सांगितलं 'मी माझ्या आयुष्यात कधीच एकत्र सहा चित्रपट केले नाहीत. यावेळी माझ्याकडे त्याचं एक कारण होतं. अखेर, जेव्हा मी निर्णय घेतला की मी आता चित्रपट करणं थांबवणार, तर मनात लगेच पुढचा विचार आला की माझ्या काम करण्यासाठी आता फक्त १० वर्ष राहिल्याची शक्यता आहे. त्यामुळे मी काम करणं थांबवणार नाही.'आमिरनं पुढे सांगितलं की 'तुम्ही तुमच्या आयुष्यावर विश्वास ठेवू शकत नाही, उद्या मरू शकतो. माझ्याकडे जवळपास १० वर्षांचं एक्टिव आयुष्य उरलं आहे. मी ५९ वर्षांता आहे. आशा आहे की जोपर्यंत मी %० वर्षांचा होत नाही, तो पर्यंत मी इतका फीट असेन की काम करु शकेन. तर मग मी विचार केला की, मी माझ्या या शेवटच्या १० वर्षांमध्ये सगळ्यात जास्त काम करायला हवं.'आमिरनं पुढे सांगितलं की 'जर जुनैद आणि लेक आयरा खान नसते तर त्यानं आतापर्यंत चित्रपट सोडले असते.' आमिरनं चित्रपटांमधून रिटायर होण्याचा विचार २०२२ मध्ये केला होता. तेव्हा तो 'लाल सिंग चड्ढा'चं शूटिंग करत होता. त्यानंतर आमिरला जुनैद आणि आयरानं समजावलं. दरम्यान, आमिर सगळ्यात शेवटी 'लाल सिंह चड्ढा' या चित्रपटात दिसला. त्याचा हा चित्रपट फ्लॉप राहिला. त्यानंतर त्यानं अभिनयातून ब्रेक घेतला होता. सध्या आमिर हा २००% मध्ये प्रदर्शित झालेल्या तारे जमीन पर' च्या सिक्वेलवर काम करत आहे. या चित्रपटाचं नाव 'सितारे जमीन पर' असं आहे. हा एक कॉमेडी चित्रपट ठरणार आहे.

# हिवाळ्यात का वाढतो हार्ट अटॅकचा धोका?

## तज्ज्ञांनी सांगितलं नेमकं कारण, ५ प्रकारे घ्या काळजी







जगभरात हार्ट अटॅकचा धोका वाढत असून वृद्धांपासून ते तरुणांपर्यंत अनेकजण दरवर्षी हार्ट अटॅकचे बळी होतात. हिवाळ्यात हार्ट अटॅकचा धोका अधिक वाढतो त्यामुळे या मोसमात हृदयाशी संबंधित आजार असलेल्या लोकांची स्वतःची जास्त काळजी घ्यावी असा सल्ला तज्ज्ञ देतात. तेव्हा हिवाळ्यात हार्ट अटॅकचा धोका टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याविषयी जाणून घेऊयात.

हिवाळ्याच्या दिवसात हृदयात अनेक बदल होत असतात. हिवाळ्यात हार्ट अटॅक येण्याचं मुख्य कारण म्हणजे तापमानात झालेली घट. वातावरण थंड असल्याने या दिवसात घाम कमी येतो आणि सॉल्ट लॉस सुद्धा कमी होतो. हिवाळ्यात कमी तापमानामुळे हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्या आकसतात. यामुळे रक्त हळूहळू हृदयापर्यंत पोहोचते. यादिवसात रक्त घट्ट होतं ज्यामुळे ब्लड प्रेशर वाढतं.

तज्ज्ञांच्या सांगण्यानुसार थंडीमुळे हृदयाच्या नसा आकुंचतात आणि हृदयाला होणारा रक्तपुरवठा मंदावतो. परिणामी रक्तवाहिन्यांमध्ये गुठळ्या तयार होतात. अशा स्थितीत रक्तपुरवठा खंडित होऊन हार्ट अटॅक येतो.

हिवाळ्यात हार्ट अटॅकची लक्षण कोणती :

छातीत वेदना, श्वास घेण्यास त्रास होणे, शरीराला सारखा घाम येणं, चक्कर येणे, मळमळ होणं उलटीसारखं वाटणं, अचानक खूप जास्त थकवा येणं इत्यादी हिवाळ्यात हार्ट अटॅक येण्यापूर्वीची लक्षण आहेत.

ताण घेऊ नये :

हिवाळ्यात हृदयाशी संबंधित आजार असलेल्या रुग्णांनी या दिवसात जास्त ताण घेऊ नये. एक्यूट स्ट्रेसमुळे हार्ट अटॅक येऊ शकतो तर क्रोनिक स्ट्रेसमुळे हृदयाच्या नसांमध्ये सूज येऊ शकते. नसांना सूज आल्यामुळे रक्त प्रवाह हळू होतो आणि त्याच्या गाठी तयार होतात.

भरपूर झोप :

हार्ट अटॅकचा धोका कमी करण्यासाठी पुरेशी झोप घेणं गरजेचं असतं. हृदयाशी संबंधित आजार असलेल्या रुग्णांनी दिवसातून % ते ८ तास झोप घ्यावी. तसेच सलग काम करू नये त्यातून थोड्या थोड्या वेळाने ब्रेक घ्यावा.

दररोज ३० मिनिटं व्यायाम :

हिवाळा हा व्यायाम करण्यासाठी उत्तम ऋतू आहे. तेव्हा हृदयाशी संबंधित आजार असलेल्या रुग्णांनी दररोज कमीतकमी ३० मिनिटे व्यायाम कराव. मात्र घराबाहेर व्यायाम करणं टाळावं. तुम्ही सायकलिंग, ट्रेडमिल आणि योगा यासारखे व्यायाम करू शकता.

सूर्यफुल आणि मोहरीचं तेल :

हिवाळ्याच्या दिवसात आहारात सूर्यफुल आणि मोहरीच्या तेलाचा वापर करा. तसेच जेवणात सॅलेड आणि फळांचा समावेश करा. बाहेरील फार्स्ट फूड टाळून तुम्ही अधिकाधिक पौष्टिक आहार घ्या.

(इथं दिलेली माहिती तज्ज्ञांशी केलेल्या चर्चेवर आधारित आहे. ही एक सामान्य माहिती आहे. कोणताही व्यक्तीगत सल्ला नाही. आपण कोणत्याही पदार्थाचं सेवन करण्याआधी याबद्दल डॉक्टर किंवा तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# सांग तू आहेस का?

पूर्वी आकाशवाणीवर पहाटेच्या मंगल प्रहरात भक्तिगीते लावली जात. अवघा महाराष्ट्र सकाळची कामे करता करता ती गाणी ऐकत असे. त्याकाळी सर्वांच्या दिवसाची सुरुवातच प्रसन्न, सकारात्मक विचाराने करून देण्याचे काम आकाशवाणी मनोभावे करत होती. त्याशिवाय संगीताच्या, गाण्याच्या वेगवेगळ्या कार्यक्रमातही भावगीते लावली जात. ती आवडीने ऐकणारा एक मोठा श्रोतृवर्ग होता. अशाच भावगीतातील काही गाणी ही भक्तीगीत म्हणूनही जन्माला आली होती. ती श्रोत्यांना सकाळच्या मंगलप्रहरी चिंतनशील करून टाकत असत. तशीही जी मने केवळ शारीरिक पातळीवरच जगत नसतात, ज्यांना खाणे-पिणे, रंगीबेरंगी पोशाख परिधान करणे, सृष्टीसौंदर्य पाहणे, आणि शरीरसुखाचा अनुभव घेणे यापलीकडेही काही करण्यासारखे आहे असे वाटत असते ती वयाच्या कोणत्या तरी टप्प्यावर चिंतनशील होतातच.

त्यांना हे जग काय आहे? मी कोण आहे? मी या जगात कशाला आलो? आणि अनिच्छेनेच का होईना पण मला इथून एक दिवस कुठे जावे लागणार आहे? असे प्रश्न पडू लागतात. पुढे पुढे या सर्व प्रश्नांच्यापेक्षा एक प्रश्न अधिकच महत्त्वाचा वाटू लागतो. तो म्हणजे हे जग कुणी आणि कशाला निर्माण केले? शिवाय खरेच असा कुणी निर्माता आहे का?माणसाला विचार करण्याची क्षमता आल्यापासून, म्हणजे खरे तर हजारो वर्षांपासून, हे प्रश्न माणसाला पडत आले आहेत. त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. त्यातूनच तर सगळे अध्यात्म सुरू झाले. त्याचा उपयोग काही माणसांनी आपापले क्षुद्र आर्थिक हितसंबंध, अनावर अमर्याद राजकीय महत्वाकांक्षा साधण्यासाठी एखाद्या धर्माच्या नावाने सुरू केला, तर भारतीय ऋषीमुनी, भगवान बुद्ध, महावीर यांच्यासारख्या विरक्त मुमुक्षूंनी खरोखर सत्य शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

भारतीय अध्यात्मात सर्वात महत्त्वाचा मानला जाणारा प्रश्न आहे कोहम?' म्हणजे मी कोण आहे? माणसाने हा प्रश्न आधी स्वत:ला विचारला होता. आणि मग त्याला ज्याने हे विश्व निर्माण केले असावे, असे वाटते त्यालाही' विचारला. या प्रश्नाचाच पुढचा भाग आपोआपच मनात येतो. तो म्हणजे कोत्वं?' म्हणजे हा सर्व जगडव्याळ पसारा निर्माण करणारा तू कोण आहेस? अनेक संवेदनशील, सकारात्मक साधकांनी आणि भाविकांनीही यावर चिंतन केलेले दिसते.

प्रसिद्ध भावगीतकर सुर्यकांत खांडेकरांनी एका सुंदर भावगीतात परमेश्वराला असेच काही विचारले आहेत. खरे तर सूर्यकांतजींचे व्यक्तिमत्त्व एका सात्विक आणि भाविक व्यक्तीचेच आहे. पण तरीही त्यांना ईश्वराकडून त्यांच्या श्रद्धेला पुष्टी देणारा होकार हवा आहे. म्हणून आपल्या कवितेत ते विचारतात, मातीतून एक तांबूस कोंब उगवतो, पुढे त्याला चिमुकली पाने येतात आणि त्याचे फुलझाड बनते. एक दिवस त्याला नाजूक डहाळ्या फुटतात. त्या नाजूक डहाळ्यांच्या अजून हळुवार झालेल्या टोकांवर मग सुंदर रंगाच्या कळ्या उमलतात, त्यांची सुगंधी फुले होतात. सगळ्या आसमंतात तो सुवास दरवळत राहतो.

कवी विचारतात, हे परमेश्वरा, तूच त्या सुंगधाचा निर्माता असतोस का रे? तूच त्या फुलांच्या कोशात लपून बसलेला असतोस का?

त्या फुलांच्या गंधकोषी,सांग तू आहेस का?

सगळ्या जगाला प्रकाशमान करण्यासाठी दिवसभर तळपणारा तुझा सूर्यतारा सायंकाळी अस्तास जातो तेव्हा तुझ्या अमर्याद आकाशात असंख्य तारे चमकू लागतात. त्यांना युगानुयुगे पुरेल इतकी ऊर्जा कोण पुरवते रे? तूच ना?



त्या प्रकाशी तारकांच्या
ओतिसी तू तेज का?

तुझ्या नभातून वायू सतत इकडून तिकडे वेगाने फिरत असतो. त्यातूनही अनेकदा आगळेवेगळे सूर ऐकू येतात. तुझी अवघी निर्मितीच जणू सतत एक गीत गुणगुणत असते असे वाटते. त्या अविरत संगीताच्या मागे उभा असलेला मुरलीधर तूच ना रे?

त्या नभांच्या नीलरंगी
होऊनिया गीत का
गात वायूच्या स्वरांनी,
सांग तू आहेस का?
त्या फुलांच्या गंधकोषी

भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे. समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः। (भगवद्गीता ९/२९) म्हणजे मी सर्व प्राणीमात्रात समानपणे सामावलेलो आहे. सुर्यकांतजी त्यांच्या अदृश्य ईश्वराला तोच प्रश्न विचारतात. माणसाचा प्राण म्हणून तूच त्याचे सगळे जीवन चालवत असतोस ना?' निसर्गात प्रचंड उत्पात घडवणारी वादळासारखी, विद्युलतेसारखी तेज:पुंज शक्ती किंवा जीवनाची निर्मिती शक्य करणाऱ्या अमृताने भरलेल्या मेघातील सृजनशक्ती तूच आहेस ना?

मानवाच्या अंतरीचा
प्राण तू आहेस का?
वादळाच्या सागराचे
घोर तें तू रूप का?
जीवनीं या वर्षणारा,
तू कृपेचा मेघ का?
आसमंती नाचणारी
तू विजेची रेघ का?
त्या फुलांच्या गंधकोषी

अवघ्या ब्रम्हांडात अगदी सूत्रबद्धपणे, शांतपणे युगानुयुगे सुरू असलेली प्रचंड कामे पाहिली की, माणसाला खात्री होते या सर्वामागे एक महाबुद्धिमान दिव्य शक्ती आहे, तिची अनंत काळासाठी आखलेली एक भव्य योजना अविरत कार्यरत आहे. ईला जेव्हा वासरू होते तेव्हा त्याच्या पोषणासाठी तिला तत्काळ दुध येणे सुरू होते आणि ते वासरू स्वावलंबी झाले की, त्याच्या मातेला आपोआप येणाऱ्या जीवनरसाचा पुरवठा आपोआप बंदही होतो? हे कसे काय? सर्वच प्रजातीतील मातांच्या लेकरांची एवढी काळजी घेणारी ती अदृश्य शक्ती आहे तरी कोण? देवा, तूच ही व्यवस्था करून ठेवली आहेस ना?' असे सुर्यकांतजी कुतूहलाने विचारतात. कारण खरेच आहे. या विश्वाचे संचालन इतके सूत्रबद्धपणे सुरू असते की, फारसा विचार न करणाऱ्यालाही त्याचे आश्चर्य वाटावे. नवजात शिशूच्या पालनपोषणाची, आरोग्याची व्यवस्था देवाने त्याच्या मातेच्या शरीरातच निर्माण होणाऱ्या दुधात करून ठेवलेली असते. तीही कालबद्ध. असेच या जगात काहीतरी पराक्रम केलेल्यांच्या, कष्टकाऱ्यांच्या डोळ्यांत एक तेज आलेले असते. तेही ईश्वरी तेजच नसते का?


जीवनी संजीवनी तू
माऊलीचें दूध का?
कष्टणाऱ्या बांधवांच्या
रंगसी नेत्रांत का?

ईश्वराचे अमूर्त, अदृश्य, निर्गुण, निराकार रूप ही तर अनेक धर्मांची धारणा आहे. त्यात ते सगळे मानवाला देवाने आपल्या रुपात निर्माण केले आहे असेच मानतात. म्हणून कवी विचारतो, देवा तुझे दृश्य, साकार रूप म्हणजेच आम्ही मानव ना, लहान बालकाच्या निरागस हसण्यातून तूच प्रकट होत असतोस ना?

मूर्त तू मानव्य का रे?
बालकांचे हास्य का?
या इथें अन् त्या तिथें रे,
सांग तू आहेस का?

त्या फुलांच्या गंधकोषी.कधी कधी मनस्वी कवींनी निर्माण करून अर्धवट सोडून दिलेले आणि प्रश्नातच त्यांची उत्तरे खुबीने गुंफलेले विचारही अनुभवणे सुखद असते. जीवनावरील श्रद्धा वृद्धिंगत करणारे ठरते.-श्रीनिवास बेलसरे

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# स्वच्छ भारत मिशनच्या जाहिराती भिंतीवर पण दुर्गंधीने नागरिक त्रस्त



**देवणी** : देवणी पंचायत समितीत स्वच्छतागृहातील अस्वच्छतेमुळे पसरलेल्या दुर्गंधीमुळे नागरिकांना श्वास रोखून धरण्याची वेळ आली असून तालुक्यातील सर्व गावाना स्वच्छतेचे धडे देणाऱ्या पंचायत समितीत अस्वच्छता दिसून येत असल्याने नागरिकांतून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पंचायत समिती ही जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्या मधील दुवा म्हणून काम करीत असते त्यामुळे सर्वच ग्रामपंचायतीचा कारभार हा पंचायत समितीच्या देखरेखी-खाली चालत असल्याने विविध विकास योजनेच्या कामाकरीता तालुक्यातील नागरीक दररोज याठिकाणी येतात.मात्र गेल्या काही दिवसांपासून पंचायत समितीतील स्वच्छतागृहातून येणारी दुर्गंधी सर्वत्र पसरली असून याठिकाणी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला नाकाला रूमाल लावण्याची वेळ आली आहे.मात्र येथील प्रशासनाला याच काहीही सोयरसुतक नाही असेच दिसून येते आहे.स्वच्छ भारत मिशनच्या जाहिराती स्वच्छतागृहांच्या प्रवेशद्वारावराच्या भिंतीवर रंगविण्यात आल्या आहेत मात्र सर्वत्रच अस्वच्छता व दुर्गंधी दिसत असून पिचकाऱ्यानी पंचायत समितीच्या कोपऱ्या कोपऱ्यात एखाद्या रंगकर्मी प्रमाणे सुंदर रंगकाम केल्याचे पाहायला मिळत आहे.त्यामुळे पंचायत समितीतील ही दुर्गंधी व अस्वच्छता कधी दूर होणार व नाकाला लावाव लागत असलेल फडक कधि बंद होणार असा प्रश्न नागरिकांतून विचारला जात असून पंचायत समितीचीच पंचायत झाल्याचे चित्र सध्या तरी पाहायला मिळत आहे.

दुर्गंधी मोठ्या प्रमाणात येत आहे हे खरे आहे व त्याचा नागरिकांनाच नाही तर आम्हालाही खूप त्रास होत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून त्याची स्वच्छता करण्यात आली नसून लवकरच त्याच्या स्वच्छतेचे काम करून दुर्गंधी दूर करण्यात येईल व नागरीकांना होणारा त्रासही दूर होईल असे गोविंद गंडाळे कनिष्ठ प्रशासन अधिकारी , पंचायत समिती देवणी यांनी सांगितले.


## घर भाडयाने देणे आहे

**राहते घर व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे नाईक चौक निडेबन रोड, उदगीर येथील राहते घर ६०X४५ चे सर्व सोईनी युक्त बँक, हॉस्पिटल, व्यापार, कोचिंग क्लासेस व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे.**

संपर्क
**रतिकांत शिवकुमार अंबेसंगे**
९४२१०७००००
९०२१०७००००


# कलेत साधना व सातत्य हवं-कु.सृष्टी जगताप




**उदगीर** : जीवनात आपण जे काही ठरवतो ते नक्की करू शकतो.फक्त त्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करावे लागतात. एखादा ध्येय प्राप्त करण्यासाठी त्याग केल्याशिवाय पर्याय नाही. या पृथ्वीतलावर कलावंत हे नेहमीच अजरामर राहिलेले आहेत. कलेत उच्च शिखर गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतात, असे विचार कु.सृष्टी जगताप यांनी व्यक्त केले.

होळसमुद्र (कर्नाटक) येथील हरिनाथ महाराजांच्या मंदिरात जागतिक बाल दिनाचे व हरिनाथ बाबांची यात्रा याचे औचित्य साधून आयोजित बाल आनंद उत्सवात कु.सृष्टी सुधीर जगताप यांचे व्याख्यान व शास्त्रीय नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. कु.सृष्टी यांची नुकतेच सलग १२७ तास नृत्य करून ज्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये नोंद झाली आहे. यावेळी मंचावर सृष्टीचे आजोबा योगगुरु बबन माने, वडील सुधीर जगताप, मा.प्रकाश राठोड व उदगीर येथून आलेले अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना कु. सृष्टी म्हणाली, आपल्याला खूप वेळ असतो. अनेकदा संधी मिळत असते. पण त्याकडे डोळस दृष्टीने पाहून आपण मेहनत घेत नाही. माणूस हा कर्तुत्ववान व प्रतिभावान आहे. प्रत्येकात कोणता तरी चांगला गुण दडलेला असतो. स्वतःला तपासात स्वतःची किंमत त्यांनी ओळखली पाहिजे.असे सांगत आपल्या यशाच्या प्रवासावर त्यांनी भाष्य केले. प्रेरणादायी मांडणी व शास्त्रीय नृत्य त्यामुळे सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

प्रतिभा कारंजे कला उत्सव कार्यक्रमात मराठी, कानडी व उर्दू शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपल्या कला सादर केल्या होत्या. यावेळी प्रमाणपत्राचे वाटप देखील करण्यात आले.

कार्यक्रमास कर्नाटक सीमा भागातील पंधरा ते वीस शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, चारशेपेक्षा पेक्षा जास्त विद्यार्थी विद्यार्थिनी व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनंत कदम, केंद्रप्रमुख महादप्पा माडीवाळ, मुख्याध्यापिका प्रतिभा सूर्यवंशी, विजयकुमार नुदनुरे, बसवराज पाटील व सत्यकुमार पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले.

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९१८/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Ishwar S/o. Vasant madale हे R/o Udgir Tq.Udgir Dist.latur दिनांक ०३/०८/२०२२ At. Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार
1) Vanita W/o. Vasant Madale, Age 68
2) Aasha W/o. Ishwar Madale, Age 40, Occu- H.H.
R/o Killa Galli, Udgir Tq.Udgir Dist.latur
3) Vidya D/o. Ishwar Madale, Age 17

यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Vanita W/o. Vasant Madale | 68 | Mother |
| 2) | Aasha W/o. Ishwar Madale | 40 | Wife |
| 3) | Vidya D/o. Ishwar Madale | 17 | Daughter |

अर्जदार यांना Ishwar S/o. Vasant madale या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Ishwar S/o. Vasant madale याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २१/१२/२०२४

के.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## जाहीर प्रगटन

*उदगीर येथील तदर्थ जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयात*

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४३/२०२४ नि.क्र.०७

1. Smt.Priyanka w/o Shailesh Panchakshari, age-42 yr Оcku-H.H.
R/o Sai Nagar. Nideban Bidar road. Udgir Dist. Latur अर्जदार
2. Krupesh s/o Shailesh Panchakashari. age-08 yrs, (Minor) Occu eduention (Applicant no. 2 is being minor u/g of her real mother is applicant no 01

सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार नामे प्रियंका शैलेश पंचाक्षरी व कृपेश शैलेश पंचाक्षरी दोघे रा. साई नगर निडेबन बिदर रोड उदगीर यांनी श्री जी एन. मेहकरे विधीज्ञ उदगीर यांच्या मार्फत अर्जदार क ०१ चे मयत पती शैलेश रामलिंग पंचाक्षरी त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार क ०१ व ०२ व शिवाणी सुर्यकांत नवाडे यांचे एकत्रीत असलेले घर क ४६७१ सर्वे क्र. ११४ प्लॉट क्र. ११ एकूण क्षेत्रफळ १८०० स्केवर फुट ज्याची
चतुः सिमा पुर्व पश्चिम ६० फुट उत्तर दक्षिण ३८ फुट, पश्चिम २२ फुट पुर्व विश्वंभर वाघमारे पश्चिम जि.प.रोड २० फुट,दक्षिणेस प्लॉट क्र १२ पश्चिम जि.प. रोड २० फुट या जमीनीची विक्रीची परवानगी मिळावी म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी जर कोणास अर्जदाराच्या सदर अर्जा संबंधीत काही उजर हरकत आक्षेप असतील तर त्यांनी आपले उजर वा आक्षेप हे जाहीर प्रगटन झालेल्या तारखेपासून ३० दिसाच्या आत लेखी स्वरुपाम सादर करावे किंवा या न्यायालयात दाखल करावेत मुदतीनंतर प्राप्त होणारे उजर व आक्षेप ग्राहय धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी तदनंतर अर्जदाराची बाजू ऐकून घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल. पुढील नेमलेले तारीख ११/१२/२०२४
आज दिनांक १५/११/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्कयानिशी देण्यात आले.

व लिपीक
प्र. अधिक्षक
जिल्हा न्यायालया-१ उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी. गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९३३/२०२४ नि.क्र. ०६

ज्याअर्थी नामे Manoharrao Narayanrao Kalegore हे दिनांक ०४.११.२००० रोजी Hali Tq.udgir Dist.Latur मयत झाले आहेत व अर्जदार
Nandkumar S/o. Manoharrao Kalegore,
Age 65 yrs, Occu. Retired,
R/o. Hali Tq.Udgir Dist.latur
यांनी खालील नमुद ६ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1. | Nandkumar Manoharrao Kalegore | 65 | Son |
| 2. | Balasaheb Manoharrao Kalegore | 63 | Son |
| 3. | Suresh Manoharrao Kalegore | 59 | Son |
| 4. | Shalinibai Prabhakarrao Kalegore | 75 | Daughter in law |
| 5. | Shobhabai Premchand Kalegore | 68 | Daughter in law |

अर्जदार याने Manoharrao Narayanrao Kalegore या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Manoharrao Narayanrao Kalegore याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०८/०१/२०२५

संतोष डी. शिंदे, कनिष्ठ लिपीक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुतराळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## जाहिरनामा

### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १६३/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार नामे तानाजी पि. गंगाराम मोतिराम, वय ४७ वर्षे, धंदा शेती रा. नागराळ ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराचे वडील नामे गंगाराम भिमराव मोतिराम उर्फ मोतीरावे हे दिनांक १९/०१/२०२४ रोजी मौजे नागराळ ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे नागराळ ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते. त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | पद्मीनबाई भ्र. गंगाराम मोतिराम | ७५ | पत्नी |
| २) | शिवाजी पि. गंगाराम मोतिरावे | ५९ | मुलगा |
| ३) | तानाजी पि. गंगाराम मोतिराम | ४६ | मुलगा |
| ४) | हरिबा पि. गंगाराम मोतिराम | ४५ | मुलगा |
| ५) | प्रल्हाद पि. गंगाराम मोतिराम | ४४ | मुलगा |
| ६) | प्रभाकर पि. गंगाराम मोतिराम | ३७ | मुलगा |

अर्जदार नामे नामे तानाजी पि. गंगाराम मोतिराम, वय ४७ वर्षे, धंदा शेती रा. नागराळ ता.देवणी जि.लातूर हिने/याने या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certif-cate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १३/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २१/१२/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक
शिक्का
(पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)


## उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




Caring Since 1980



कै. यशवंतराव बहुउद्देशिय मेडिकल रिसर्च सेंटर द्वारा संचलित
४१ वर्षापेन

## यशवंत नेत्र रुग्णालय व फॅको सेंटर

(दृष्टी-एकमेव धेय्य)

डॉ. विश्वास य. सताळकर - नेत्ररोग तज्ञ | डॉ. यशोधन वि. सताळकर - बाल नेत्ररोग तज्ञ | डॉ. अनुजा य. सताळकर - नेत्ररोग तज्ञ

यशवंत नेत्र रूग्णालय व फॅको सेंटर
नंदादीप, नगर परिषदेच्या मागील बाजूस, नई अबादी, उदगीर फोन : 02385-256215

DEEPJYOTI EYE HOSPITAL UDGIR

## दिपज्योती डोळयांचा दवाखाना




**डॉ. ज्योती सोमवंशी**

M.B.B.S., M.S. Ophthalm
Consultant in Catract, Glaucoma, & Pediatric Ophthalmologist

30 वर्षाचा अनुभव
डोळयांचे 60 हजार यशस्वी ऑपरेशन



उपलब्ध सुविधा
उदगीर शहरात प्रथमच आत्याधूनीक मशिन (Infinity) व्दारे शस्त्रक्रिया.भुल न देता डोळया वरील मोतीबींदूचे शस्त्रक्रिया. मल्टीफोकल लेन्स यामुळे दुर आणी जवळचे चष्मा न घालता दिसण्याची सोय (Spectacle Free).बीनाटाक्याची मोतीबींदूवर शस्त्रक्रिया.लहान मुलामध्ये मोतीबींदू वर उपचाराची सोय.काच बिंदूचे निदान, उपचार,शस्त्रक्रियाची सोय. डोळ्यावरील पडदा, नासूर उपचाराची सोय.कॉम्प्युटर व्दारे नेत्र तपासणी.

नाईक चौक,निडेबन रोड, उदगीर जि.लातूर
"WE CARE FOR YOUR EYES"

## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| | | | |
|---|---|---|---|
| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |

| | |
|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव

# मतदारसंघात एकतरी पाझर तलाव सावंत यांनी केला का त्याचे उत्तर जनतेला द्यावे - मोटे



परंडा दि.१५ (प्रतिनिधी) - परंडा विधानसभा मतदारसंघाची निवडणुक अतिशय रंगतदार वळणावर आली आहे उमेदवार आपापल्या कामाचं पाढा मतदारांसमोर वाचत आहेत तर विरोधी उमेदवारांनी दिलेली आश्र्वासने पूर्ण झाली नाहीत याचे पुरावे ऑडियो ,व्हिडिओ क्लिपद्वारे मतदारांसमोर मांडत आहेत. दि.१४ नोव्हेंबर रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार माजी आमदार राहुल मोटे यांनी महाविकास आघाडीच्यावतीने आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत मोटे यांनी पत्रकार परिषदेत शिवसेना महायुतीचे उमेदवार प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्यावर अनेक आरोप केले.

परंडा येथील आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना मोटे म्हणाले की, प्रा डॉ सावंत हे फक्त खोटी आश्र्वासने देत असून त्यांनी मतदार संघातील जनतेची फसवणूक केली आहे. गेल्या निवडणुकीत हिंगणगाव व आसू येथील तलावात पाणी आणण्याचे आश्र्वासन दिले होते. ते का पूर्ण झाले नाही ? याची उत्तर त्यांनी द्यावीत. तसेच इराचीवाडी येथील पाझर तलावाचे ८० टक्के काम मी आमदार असताना पूर्ण झाले. सावंत यांनी त्यांच्या ५ वर्षाच्या कार्यकाळात का पूर्ण केले नाही ? याचे उत्तर मतदार संघातील जनतेला द्यावे असे आवाहन मोटे यांनी सावंत यांना दिले.

तसेच खडेश्र्वरवाडी धरणाची दुरुस्ती ५ वर्ष का रखडली ? गिनीज बुकमध्ये नोंद झाली नसताना आरोग्याची वारीची नोंद ग्रीनीज बुकमध्ये झाल्याचे सावंत हे जनतेला खोटे सांगत आहेत. त्यामुळे १२ लाख वारकऱ्यांची तपासणी न करता तपासणी दाखवून मोठा घोटाळा केल्याचा आरोप मोटे यांनी केला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रणजीत पाटील, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष ड. हनुमंत वाघमोडे, संदीप पाटील, नुरोद्दीन चौधरी, जयकुमार जैन, राहुल बनसोडे, रमेश परदेशी, धनंजय मोरे, सुभाषराव वेताळ, बाशाभाई शहाबर्फीवाले, श्रीहरी नाईकवाडी, नसीर शहाबर्फीवाले, नंदू शिंदे, खयूम तुटके, कोलते पाटील आदींसह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील मतदान पथकांना ईव्हीएम हाताळणी प्रशिक्षण

लातूर, / प्रतिनिधी: लातूर शहर विधानसभा मतदार संघाच्या मतदान प्रकियेतील मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी व इतर मतदान अधिकारी यांचे व्दितीय प्रशिक्षण १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी दयानंद महाविद्यालयामध्ये झाले. यावेळी त्यांना ईव्हीएम हताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण दोन टप्पात घेण्यात आले पहिल्या सत्रात ८६६ आणि दुसऱ्या सत्रात ८६४ असे एकूण १ हजार ७३० नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणामध्ये तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून ईव्हीएम यंत्र हाताळण्याचे प्रात्यक्षिक व निवडणूक प्रक्रियेबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण स्थळी निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. अधिकारी, कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिकेद्वारे आपले मत नोंदवून लोकशाहीच्या महोत्सवात सहभाग नोंदविला. प्रशिक्षणास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती वर्षा ठाकुर-घुगे यांनी भेट देवून निवडणूकीच्या प्रशिक्षणास निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे - विरोळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार गणेश सरोदे यांची उपस्थिती होती.

# सर्व प्रकारचे अन्याय दूर करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या मतांचा वापर करा - खा आझाद

## भैय्यासाहेब नागटिळक यांना विजयी करावे

तुळजापूर दि.१४ (प्रतिनिधी) - स्वातंत्र्यापूर्वी दलित, महिला व गरिबांवर अन्याय अत्याचार मोठ्या प्रमाणात केले जात होते. पूर्वी राणीच्या पोटातून राजा जन्माला जात होता. त्याला शिक्षण नसले तरी किंवा अत्याचारी असला तरी तो राजाच राज्य करायचा. मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून सर्वांना मताचा अधिकार दिला आहे. या माध्यमातून राजा निवडण्याची मोठी शक्ती दिली असून आपल्यावरील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी मताच्या वापर करून आपणच शासनकर्ती जमात व्हावे यासाठी मोठी शक्ती दिलेली आहे. मात्र मोठ्या घरातील व्यक्ती, हेलिकॉप्टर व आलिशान गाड्यांमध्ये फिरणारी मंडळी गरिबाकडे येऊन त्यांच्या झोपडीमध्ये जाऊन जेवण करतात व आपण दोघे भाऊ भाऊ असे म्हणून त्यांचे मत घेऊन निवडून येतात व राज्य करतात. तेच पुन्हा आपल्यावर अन्याय अत्याचार करीत असल्यामुळे आपण आपल्या मताचा आपणच राजा होण्यासाठी आपल्याच समाजातील व्यक्तीला निवडून द्यावे. त्यामुळे तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील आजाद समता पार्टीचे उमेदवार भैयासाहेब नागटिळे यांना निवडून द्यावे असे आवाहन आझाद समता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष तथा खासदार चंद्रशेखर आझाद रावण यांनी दि.१५ नोव्हेंबर रोजी केले.

तुळजापूर येथे आजाद समता पार्टीचे उमेदवार भैय्यासाहेब नागटिळे यांच्या प्रचारार्थ श्रीनाथ मंगल कार्यालयात आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना खा. चंद्रशेखर आझाद म्हणाले की, पूर्वी खुर्चीवर बसण्यासाठी आपणाला संघर्ष करावा लागत होता. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्तेच्या खुर्चीवर बसण्याची आपणाला ताकद दिली आहे. मात्र सत्तेच्या खुर्चीवर बसण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम नसल्यामुळे सत्तेचे हकदार असताना आम्ही खुर्चीवर बसत नसून इतरांना मतदान देऊन खुर्चीवर बसवीत असल्याचे सांगत त्यांनी सांगितले. तर डॉ आंबेडकर यांचा स्वाभिमान बाळगा असे आवाहन तरी ते म्हणाले की, आपण डॉ आंबेडकरांना मानत असाल तर डॉ आंबेडकरांनी सांगितलेले ऐकले असे त्यांनी नमूद केले. निवडणुकीमध्ये कोणीच एक व्यक्ती यशस्वी होत नसते त्यामुळे त्यासाठी सर्वांचे काम महत्त्वाचे असते असे सांगत ते म्हणाले की, काम केल्यामुळे सर्वांना इज्जत मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. राजकीय ताकद मिळविण्यासाठी राजनीतिक विचार व ध्येय निश्र्चित असेल तरच शासनकर्ती जमात बनता येते असे त्यांनी आवर्जून सांगितले. निवडणुकीमध्ये शेळ्या, बकऱ्या जिंकत नसतात तर अनेक योध्दे या निवडणुकीमध्ये उतरत आहेत. मात्र बाबासाहेबांच्या लेकरांना जेवढा दम व समर्पण केलेले आहे तेवढे इतर कोणीही केलेले नसल्याचे त्यांनी सांगितले. ही निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवार मीच आहे असे समजून फक्त दोन तास व्यवस्थित प्रचार यंत्रणा राबवावी. तसेच एका मतदाराने कमीत कमी ५० मते गोळा करण्यासाठी मेहनत केली तर आपला उमेदवार निश्र्चित विजयी होईल असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. आजही धर्माच्या, भोजनाच्या, नावावर टोपीवरून व शेतकऱ्यावर अन्याय करण्याचे काम प्रस्थापित पक्षाची मंडळी करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे बाबासाहेबांनी दिलेल्या मताच्या अधिकाराचा वापर करून आपणच राजा बनवायचे व आपल्या मुलांचे भवितव्य सुरक्षित करायचे असे त्यांनी सांगितले. मात्र आपल्याच मतावर निवडून आल्यानंतर ही प्रस्थापित मंडळीची मुले आयएसआयपीएस व न्यायाधीश बनवतात. तर तुमची मुले मजुरीचे काम करीत करतात. त्यामुळे मताच्या माध्यमातून सत्ता मिळवून सर्व यशस्वी मार्गाचे कुलूप खोलावे असे आवाहन खा आझाद यांनी केले. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पान १ वरून

### भाजपसोबत...

भाजपविरोधात लढलो तरी स्थिर सरकार देण्यासाठी राष्ट्रवादी आणि भाजपने मिळून एकत्र सरकार स्थापन करण्याचे ठरले, असे शरद पवार जाहीर करणार होते.

### जनतेचा...

चालणा-या गाड्या चार महिन्यांत बाजारात येणार आहेत. सुरुवातीला महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेश या चार राज्यांत इथेनॉलचे पंप उभारून पेट्रोलला पर्याय देणार आहे. त्याचा फायदा शेतक-यांना होणार आहे.

### मी मुख्यमंत्रिपदाच्या....

लढा द्यायचा असल्याने त्यांची सर्व ताकद प्रयत्नपूर्वक एकवटायची होती त्यातच त्यांचा सुरुवातीचा काळ गेला.

यामुळे एकनाथ शिंदे यांना लढविण्यासाठी जास्त जागा मिळाल्या, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले तसेच महायुतीमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी जास्त जागा, स्ट्राइक रेट असे कोणतेही निकष ठरलेले नाहीत. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर एकनाथ शिंदे, अजित पवार आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष एकत्र बसून निर्णय घेतील, असेही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### छ. संभाजीनगरात....

विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात सात ठिकाणी वाहन तपासणीसाठी स्थिर पथकांची स्थापना करण्यात आली आहे. संभाजीनगरकडून जळगावकडे जाणा-या वाहनाची तपासणी केली असता त्यांना यात १९ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने सापडले.

दागिन्यांची कागदपत्रं तपासणार

जप्त केलेले दागिने जळगाव येथील एका नामांकित सराफा व्यावसायिकाचे असल्याची माहिती सहायक गटविकास अधिकारी अहिरे यांनी दिली. पथकाने दागिने जप्त करून ते जीएसटी पथकाच्या स्वाधीन केले आहेत. दागिन्यांच्या व्यवहाराचा तपशील तपासला जाणार आहे. अशी माहिती अधिका-यांनी दिली आहे.

### भाजपशी मतभेद...

भाजप नेते दानवेंची प्रतिक्रिया : आमच्यापुढे दोन प्रश्न आहेत, हरवायचं कुणाला, आम्ही महाराष्ट्रातील जनतेला साद घालतोय. उद्धव ठाकरेंना हटविण्यासाठी आम्हाला साथ द्या, मात्र त्यांनी आम्हाला साद घातली अब्दुल सत्तार यांना हटवायला साथ द्या. हा पक्षांतर्गत प्रश्न आहे. या विषयावर मी फारसं भाष्य करणार नाही. मी भाजपचा राज्यातील प्रमुख आहे. एका जागेचा विचार करत नाही. महायुती एकत्रित असा विचार करतोय.

### महात्मा....

ऐतिहासिक ठरणार आहे, असेही अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

ताईंनी सांगितले की, राज्यातील सर्व लाडक्या बहिणी महायुतीच्या सोबत आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा राज्यात महायुतीची सत्ता येणारच आहे. लातुरात विरोधक अपप्रचार करत आहेत. त्यांच्याकडे कर्तृत्व नाही. पदयात्रेत पूर्वजांचे फोटो घेऊन ते फिरत आहेत परंतु आता त्याचा फायदा होणार नसल्याचे ताई म्हणाल्या.

भाजपाने आपल्या वचननाम्यात लाडक्या बहिणींसाठी दिला जाणारा निधी १५०० रुपयावरून २१०० रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पुढील महिन्यापासून बहिणींच्या खात्यात अधिक रक्कम जमा होणार असल्याचेही डॉ. अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

यावेळी सचिन दाने,अजित पाटील कव्हेकर,प्रशांत पाटील यांनीही विचार मांडत डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना विजयी करण्याचे आवाहन केले. या सभेस शहर मतदारसंघातील भाजपा व महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते, नागरिक व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### औशाच्या...

नाव मी घेणार नाही असा टोला विरोधकांना लगावत एकंदरीत या सर्व गोष्टींचा विचार करून हा तालुका विकासाच्या पटरीवर ठेवण्यासाठी काम करणारी व्यक्ती निवडून देणेही काळाची गरज आहे. त्याच्याकडे आपण पाहावे अन्यथा आपण जर भरकटलो तर येणारी पिढी आपणाला माफ करणार नाही. हे स्पर्धेचे युग आहे. आपल्या तालुक्याचा विकास करून आपला तालुका समृद्धीच्या मार्गावर घेऊन जाण्याची गरज आहे. ते काम कधी घडते तुमच्या मतदानावरून घडते. त्यामुळे. हे मतदान म्हणजे अभिमन्यू पवार यांच्या विकासाला मतदान आहे. या मतदारसंघात माझी व अभिमन्यू पवार यांची कामातून व विचारातूनच ओळख निर्माण झाली आहे. म्हणून विकास आणि चांगल्या विचाराला प्रेम करणारे लोक याभागातील आहेत. असे सांगून अभिमन्यू पवार यांना मतदान म्हणजे विकासाला मतदान, अभिमन्यू पवार यांना मतदान म्हणजे सर्व धर्म समभाव ला मतदान, अभिमन्यू पवार यांना मतदान म्हणजे एका चांगल्या लोकप्रतिनिधीला मतदान अभिमन्यू पवार यांना मतदान म्हणजे या लोकाभिमुख सरकारला मजबूत करण्यासाठी मतदान म्हणून आपले मत कुठेतरी वाया न जाऊ देता एका चांगल्या कामाला मतदानाच्या रूपाने या लोकशाहीला मदत झाली पाहिजे या सदसद्विवेकबुद्धीने स्मरून हे मतदान केले पाहिजे आणि मला खात्री आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या रूपाने एक विकासाच्या लोकप्रतिनिधी आपण प्रचंड बहुमताने निवडून देणार आहेत. असा विश्वास यावेळी बोलताना माजीमंत्री बसवराज पाटील यांनी व्यक्त केला.

### लातुरला पहिली...

मानसिकतेची जोड हवी असते. पण लातूरच्या लोकप्रतिनिधींकडे नेमका याचाच अभाव आहे.

वैद्यकीय सेवा देणाऱ्यांनाही लातुरात सुविधा मिळत नाहीत. पण आता तसे होणार नाही. रुग्णसेवा करणाऱ्यांना अडचण होणार नाही,असा शब्द डॉ. अर्चनाताई पाटील यांनी दिला. डॉक्टरांच्या आयएमए हॉल साठी अनेक वेळा आश्वासने दिली गेली पण अजूनही त्याचे काम झाले नाही.आपण संधी देत मला विजय केले तर पुढची बैठक आयएमए हॉलच्या भूमिपूजन सोहळ्यातच होईल, असे ताईंनी म्हणताच टाळ्यांचा कडकडाट झाला. कोविडच्या संकटात आपले आमदार विदेशात जाऊन बसले होते.मी मात्र उदगीर येथे रुग्णसेवेत व्यस्त होते.त्या काळात माझ्या रुग्णालयाला ऑक्सिजन मिळू नये यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ही मानसिकता योग्य नव्हती,असे ताई म्हणाल्या. डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या की,शहरात पाणी, कचरा या मूलभूत समस्या आहेत.त्या समस्या सोडविण्यासाठी काम करण्याची गरज आहे.चाकूरकरांच्या रक्तात लोकसेवेचा डीएनए आहे.जात-पात न मानता सर्वसमावेशक विकास करणे हाच माझा ध्यास आहे.माझ्याकडे हरण्यासाठी काही नाही,मी जिंकणारच आहे. आपले प्रेम व विश्वास तुटू देणार नाही.इथून पुढचे जीवन जनतेसाठी समर्पित आहे,असेही डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

प्रस्थापितांची दहशत मोडून आपण या बैठकीस उपस्थित राहिलात त्याचा मनस्वी आनंद झाल्याचेही डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

बैठकीचे सूत्रसंचलन डॉ. ऋजुता अयाचित तर आभार प्रदर्शन रागिनीताई यादव यांनी केले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची बैठकीची सांगता झाली.या बैठकीस शहरातील बहुतांश महिला डॉक्टरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. एकच गर्जना,पाटील अर्चना यावेळी सर्व महिला डॉक्टरांनी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या समवेत सेल्फी घेण्यासाठी त्यांना गराडा घातला. महिला डॉक्टरांनी घोषणाही दिल्या. एकच गर्जना,आमदार होणार डॉक्टर अर्चना, काय म्हणता लातूरकर ? आता डॉक्टर अर्चना पाटील चाकूरकर या घोषणांनी कस्तुरी मंगल कार्यालय दणाणून सोडले.

### विरोधकांना....

धीरज देशमुख यांना अधिक मताधिक्य द्यावे माजी मंत्री दिलीपराव देशमुख

आम्हाला कॉंग्रेसला या भागातून १९८० पासून आपण आशिर्वाद दिलेले आहेत तुमचे आमचे वेगळे नाते राहिलेले आहे या भागात रस्ते सिंचन शेतकऱ्यासाठी विविध योजना राबवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम जिल्हा बँक, मांजरा साखर परिवारातील साखर कारखान्यानी केलेले आहे पुढेही आपण करणार आहोत आपण कधी पक्ष बदलला नाही आपला विचार कॉंग्रेस पक्षांचे विचार सर्व धर्म समभाव सामाजिक सलोखा निर्माण करणारा राहिलेला सर्व कामे करण्याचा प्रयत्न केलेला आहे जी काही कामे राहिलेली असतील ते आपण करण्यासाठीं कटिबध्द आहोत पुढेही राहू असे सांगून कोणी तरी येईल भूलथापा देईल यापासून आपण सावध राहिले पाहिजे एक चांगल काम या भागात सहकार क्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे ते जपण्याचे काम आपल्या माध्यमातून करायचं आहे त्यामुळें लीड मिळेलच पण अधिक मताधिक्य पश्चिम भागातून मिळाव अशी अपेक्षा माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी यावेळी व्यक्त केली त्यावेळीं उपस्थित मतदारांनी दाद दिली.

ठिकठिकाणी दिलीपराव देशमुख यांचे जल्लोषात स्वागत

गुरुवारी लातूर तालुक्यातील मुरुड अकोला येथील खंडोबा मंदिर, विठ्ठल मंदिर, शिराळा येथील नागोबा मंदिर, चिंचोली ब येथील भैरवनाथ मंदिरात जावून माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी दर्शन घेतले त्यानंतर संवाद बैठकीला प्रारंभ करण्यात आला गावागावात मोठ्या प्रमाणावर फटाक्याच्या आतषबाजीने स्थानीक ग्रामस्थांनी ढोल ताशांच्या गजरात स्वागत केले .

धीरज देशमुख याना पश्चिम भागातून अधिक मताधिक्य मिळणार माजी आमदार वैजनाथ शिंदे यांचे प्रतिपादन

लातूर तालुक्यातील पश्चिम भागात गेली ३०वर्षापासून विकासाची कामे पूर्ण झाली आहेत मांजरा साखर परिवारातील साखर कारखाने,जिल्हा बँकेने या भागातील लोकांना आर्थिक सुबत्ता देण्याचे काम केले होते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब, माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली या भागात विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्न केले लोकांच्या मदतीला धावून या नेत्यांनी लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला विकासाच्या बाबतीत पुढें घेवून दळण वळण व्यवस्था उभी राहिली त्यांचे श्रेय आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांच्या कडे जाते उमेदवार आमदार धीरज देशमुख यांनी मागच्या पाच वर्षाच्या काळात या भागात अनेक चांगली विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत जिल्हा बँकेकडून शून्य टक्के दराने पाच लाख रुपये देण्याची योजना राबवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम केले त्यामुळें या पश्चिम भागातून कॉंग्रेस आघाडीचे उमेदवार आमदार धीरज देशमुख यांना अधिक मताधिक्य मिळेल असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे.


## टी.सी हरवली आहे

तैमुरअली मुर्तुजाअली सय्यद या नावाची दयानंद उच्च माध्यमिक विद्यालय बाभळगाव या नावाची ११वी पासची टी. सी बाभळगाव ते विवेकानंद चौक प्रवासादरम्यान हरवले आहे तरी कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**मोबा-९५७९११६१३४**



## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार शाहेदा गुलाब पठाण रा. काळे गल्ली, लातूर यांनी दिलेली माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकृत केल्यावरुन लातूर जिल्हयातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी घरजागेचे विद्यमान मालक शेख महेबुब नजीरसाब रा. मदनी नगर, लातूर यांच्या खरेदी व मालकी कब्जे वहिवाटीचा प्लॉट ज्याचा खरेदीखत दस्त डेबुक नं. १३७०/१९९६, दि.२८/०५/१९९६ ईसवी अन्वये मौ. लातूर शहर मनपा हद्दीतील मदनी नगर, लातूर येथील सिटी सर्वे नं. २५७८ पैकीचा प्लॉट नं. २९ विक्री करत असून व प्लॉट नं. १ चा पूर्वबाजूचा भाग विक्री करत असून याचे विक्री क्षेत्र लांबी दक्षिण उत्तर ४० फुट व रुंदी पूर्व पश्चिम १२.६ फुट असून तसेच तुकडा नं. ०२ याचे विक्री क्षेत्र लांबी दक्षिण उत्तर १५ फुट व रुंदी पूर्व पश्चिम १२.६ फुट असून सदरील दोन्हीही प्लॉटचे तुकडे एकमेकास लगत विक्री करत असून याची चतुःसिमा खालीलप्रमाणे :- पुर्वेस-शेख तय्यब यांचे घरजागा,पश्र्चिमेस-सदरील प्लॉटचा उर्वरित भाग, दक्षिणेस-सरकारी रस्ता, उत्तरेस- खलील यांचे रहाते धरजागा, येणेप्रमाणे चतुःसिमेच्या आतील घरजागेचे विद्यमान मालक शेख महेबुब नजीरसाब रा. मदनी नगर, लातूर यांनी सदरील घरजागा माझे पक्षकारास कायमस्वरुपी विक्रीचा ठराव करून, ठरावापोटी कांही रक्कम इसार म्हणून स्विकारली आहे. तरी सदर घरजागेबाबत कोणाचा उजर, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, लीन, शेजाऱ्याचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज असेल त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झालेपासुन सात (७) दिवसाचे आत माझे खालील दिलेल्या कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर दाखल करावा. मुदतीमध्ये जर कोणाचा आक्षेप नाही आल्यास सदरील घरजागा ही निर्वेध व निर्जोखीम आहे असे गृहित धरुन माझे पक्षकार सदर घरजागेचे रजिस्टर्ड खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मुदतीनंतर येणारे उजर / आक्षेप माझे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्याची.

दिनांक : १५/११/२०२४

सबब हे जाहीर प्रगटन,

**जाहिर प्रगटन देणार**

तर्फे

**Adv. P. V. Kalure**
**Notary Govt. of India**
**Latur Dist. Latur**
**Mob. No.7058620583**

**शाहेदा गुलाब पठाण**
**रा. काळे गल्ली, लातूर**
**मो. नं. ९६६५३८००१८**



## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.उदगीर नगरपरिषद, उदगीर जि.लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस - | ५.५० % |
| ४६ ते १८० दिवस | ७.५० % |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५० % |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५० % |
| ३६ महिने ते ६० महिने | १० % |

९ % आवर्त ठेव द.सा.द.शे. ०.५० % अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट,७८ महिने, वैधानिक कर्ज व इतर कर्ज १६ % सोने तारण कर्ज १४ % केअर हाउस कर्ज १६ %, वरिल सर्व ठेवीवर निमय व अटी लागू.

दैनिक यशवंत
शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०२४
पान ८
उदगीर
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com



बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ५.००% | ५.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | १०.००% | १०.५०% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.५०% | ११.००% |

**मासिक प्राप्ती योजना :-** आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८६७/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३६ महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (१०.५०%)
**दाम दुप्पट योजना :-** रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)
**आवर्तक ठेव योजना (RD) :-** (०१/१०/२०२३ पासुन लागू)

| अ.क्र | मुदत/कालावधी | व्याजदर |
|---|---|---|
| १ | १३ ते २४ महिने | ९.२५% |
| २ | २५ ते ३६ महिने | ९.५०% |
| ३ | ३७ ते ६० महिने | १०.२५% |
| ४ | ६० महिने ते पुढे | ९.००% |

# आज माळेवाडी येथे जगत्गुरु डॉ. चंद्रशेखर महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात शिवलिंग प्राण प्रतिष्ठापना व कलारोहन

## कलशधारी सुहासिनी व ढोल ताश्यांच्या निणादात महास्वामीजींची गावातुन भव्य मिरवणुक







**उदगीर (प्रतिनिधी)** काशिपीठाचे जगत्गुरु डॉ. चंद्रशेखर महास्वामीजी यांच्या दिव्यसानिध्यात आज माळेवाडी येथे शिवलिंग प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहन कार्यक्रम संपन्न होत असुन त्यानिमित्याने महास्वामीजींचे कलशधारी सुहासिनी व ढोल-ताश्याच्या निनादात पावले खेळत शिवनामाचा गजर करीत माळेवाडी गावातुन भव्य मिरवणुक संपन्न झाली.

उदगीर शहरा-लगत असलेल्या श्री-क्षेत्र माळेवाडी येथे उभारण्यात आलेल्या भव्य महादेव मंदिरात शिवलिंग प्राण प्रतिष्ठापना व कलशारोहन समारंभ दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वा. काशीपीठाचे जगत्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात संपन्न होणार आहे संपन्न होत आहे.

या निमित्य शुक्रवार दि. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता जगत्गुरु डॉ. चंद्रशेखर महास्वामीजी यांची गावातुन भव्य रथात बसुन कलसधारी सुहासिनी तसेच संघर्ष मित्र मंडळ व आदर्श ढोलताशा पथक माळेवाडी यांच्या निनादात पावले खेळत शिवनामाचा गजर करीत मंदिरस्थळ भव्य मिरवणुक संपन्न झाली यावेळी त्रिपुरा पोर्णिमेनिमित्त हनुमान मंदिर समोर जगत्गुरुंच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन दिपोत्सव साजरा करण्यात आला.

नव्याने च उभारण्यात आलेल्या मंदिरात महास्वामीजीनी मंदिर उभारणीची



पाहणी केली. यावेळी आयोजित अशिर्वचन कार्यक्रमाची दिपप्रज्वलन सुरुवात झाली. यावेळी मंदिर समिती व ग्रामस्थांच्या डी. वाय.बिरादार यांनी महास्वामीजींचे स्ववतीने पुष्पमाला अर्पण करुन स्वागत करण्यात आले. तर डॉ. राजशेखर शिवाचार्य महाराज विमलखेड गोरठा यांनी शिवलिंग मंदिर उभारणी मागील तथा उपस्थितांना सांगीतले. व गेल्या तीन दिवसापासुन आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक कार्यक्रमाची माहिती सांगुन १५० शिवभक्तांना शिवदिक्षा दिल्याचे सांगीतले. प्रास्ताविकात कमलाकर बिरादार यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भुमिका सांगीतले.

यावेळी आपल्या अशिर्वचनात जगत्गुरु म्हणाले की, त्रिपुरा पोर्णिमेनिमित्त काशी येथे दिपोत्सव होत असतो. तो कार्यक्रम माळेवाडी येथे होत आहे.

सारे जग ईश्वराचे आहे ईश्वर अणुरेणुपेक्षाही लहान ही आहे मोठाही आहे. सर्व जग लिंगामध्ये सामावले आहे. संपूर्ण जगाला आपल्या उदरात जागा दिले आहे. महादेव मोठा आहे परंतु महादेवाची पुजा करणारा भक्त हा त्यापेक्षाही मोठा आहे. म्हणून देवापेक्षाही मोठा आहे. माणासाच्या हातुन कळत न कळत दोष होत असतात सर्व दोषाचे निकारण करण्यासाठी एकमेव साधन शिवलिंगाची पुजा होय असे सांगुन रामेश्वर येथील लिंगस्थापना व श्रीशल्यम लिंगस्थापना श्रीरामाने केली असत्याचे सांगीतले.

कार्यक्रमाचे संचलन व आभार मच्छिंद्र येरोळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डि.वाय बिरादार माळेवाडीकर, सरपंच संगीता राजकुमार हकिम, उपसरपंच रमेश बिरादार,अनिल कोनमारे कौळखेडकर,गंगाधर बिरादार, चिंतामणी बिरादार, मच्छिंद्र .यरोळे, बाबुराव मदनुरे, सुशिलकुमार जीवणे, गुरुनाथ बिरादार, विश्वनाथ बिरादार,किशनराव बिरादार,उमाकांत दाडगे,मधूकर पाटील माळेवाडीकर ,कमलाकर पाटिल,सुधाकर पाटिल,मल्लिनाथ बिरादार,वेदमुर्ती रामलिंग स्वामी तोंडारकर , मनोज झुंगा स्वामी यासह ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

या कार्यक्रमात कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शिवाजीराव हुडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बस्वराज पाटील नागराळकर यांनी दर्शन घेवून अशिर्वाद घेतला या कार्यक्रमास महिला पुरुष अबाल भाविक भक्त मोठया संख्येने उपस्थित होते.

# उदयगिरी महाविद्यालयात बिरसा मुंडा व गुरु नानक जयंती साजरी



**उदगीर (प्रतिनिधी)** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात गुरुनानक आणि बिरसा मुंडा यांची जयंती साजरी उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात शीख धर्म संस्थापक गुरुनानक आणि क्रांतिवीर बिरसा मुंडा जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार, स्टाफ़ सेक्रेटरी प्रा. डॉ. बी. डी. करंडे, प्रा. डॉ. आर. के. नारखेडे, प्रा. प्रशांत वाघमारे यांच्यासह प्राध्यापक कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मुख्य रस्त्यांनी उदगीर शहराला जोडून दळणवळणाची व्यवस्था मजबुत केली : ना संजय बनसोडे



**उदगीर (प्रतिनिधी)** कुठल्याही शहराचा विकास हा तेथील दळणवळणाच्या सुविधेवर अवलंबून असतो, उदगीरला विकसित शहर म्हणून उदयास आणण्यासाठी आपण या शहराच्या चारही बाजूचे रस्ते दर्जेदार करून आजूबाजूच्या शहराशी जोडून दळणवळणाची व्यवस्था मजबूत करण्याचे काम मागील पाच वर्षांच्या काळात केले असल्याचे प्रतिपादन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार मंत्री संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ डॅम रोड परिसरात प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री बनसोडे बोलत होते.

यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, बस्वराज बागबंदे, उषा कांबळे, रामराव बिरादार येनकीकर, समीर शेख,भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, बस्वराज पाटील कोळखेडकर, डॉ. प्रकाश येरमे, सुदर्शन मुंडे, उत्तरा कलबुर्गे, बालाजी भोसले, अनिल मुदाळे, विजय निटूरे, सुधीर भोसले, साईनाथ चिमेगावे, संदीप देशमुख, अमोल अनकल्ले, अरुणा चिमेगावे,ॲड. वर्षा कांबळे, दीपाली औटे, प्रकाश राठोड, सावन पस्तापुरे, गणेश गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री बनसोडे म्हणाले की, आज घडीला उदगीर शहरात वाहतुकीचा त्रास होत आहे. हा त्रास कमी करण्यासाठी शहराच्या बाजूने गेलेल्या वळण रस्त्याचे काम आगामी काळात पूर्ण करण्याचा माझा संकल्प आहे. मलकापूर परिसरातील पुलाचे काम लवकरच पूर्ण होत असून त्यामुळे शहराची वाहतूक सुरळीत होणार आहे. डॅम रोड वरील नागरिकांनाही रेल्वे गेट मुळे होणारा त्रासही आगामी काळात होणार नाही यासाठी उड्डाण पूल तयार करण्यात येणार असल्याचे मंत्री बनसोडे म्हणाले. गेली पाच वर्षे मी आमदार व मंत्री म्हणून या भागाची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. आगामी काळातही ही सेवा अशीच चालू ठेवण्यासाठी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी आशीर्वाद देऊन आपल्याला निवडुन द्यावे असे आवाहन मंत्री बनसोडे यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे यांनी डॅम रोडचा भाग हा भाजपाचा बालेकिल्ला आहे. या भागातून ना. बनसोडे यांना सर्वाधिक मताधिक्य देणार असा विश्वास व्यक्त करून गेल्या निवडणुकीत निवडून आल्यापासून ना. बनसोडे यांनी कामाचा धडाका चालू ठेवला. २४ तास जनतेसाठी सेवा करणारा नेता म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. कोरोना काळात स्वतः ला दोनदा कोरोना होऊन देखील या भागातील जनतेला आरोग्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी मोठी धडपड केली होती, असे सांगून सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी सदैव धडपडत राहणाऱ्या अशा नेतृत्वाला जपण्याचे काम मतदारांनी करावे असे आवाहन बागबंदे यांनी केले. महायुतीच्या सरकारने महिलांच्या सन्मानासाठी अनेक कामे केली आहेत

उज्वला गॅस योजना, घरकुल योजना, आनंदाचा शिधा अशा अनेक महत्वपूर्ण योजना राबवित असतानाच आपल्या नावापुढे आईचे नाव लावण्याचा कायदा केला असून आगामी काळात ३३ टक्के आरक्षण महिलांना देण्यात येणार आहे. अशा महिलांच्या सन्मान करणाऱ्या महायुतीला पुन्हा एकदा सत्तेवर आणण्याचे आवाहनही यावेळी बस्वराज बागबंदे यांनी केले.

## घर विकणे आहे

शिवाजी महाविद्यालय /विद्यावर्धिनी हायस्कुलच्या पाठीमागे नई अबादी उदगीर येथील बलराम रामचंद्र येरमे यांचे घर ज्याची साईज ८०x८० दोन मजली घर ज्यात सर्व सोईनी युक्त असलेले ३१ रुम विकणे आहे.

संपर्क : ९८२३६३२३००, ९४२३३४७७५०, ९०९६४२४०४२